रूपक

'रूपक' या नाटकाचा पहिला प्रयोग राज्य नाट्य स्पर्धेमध्ये सादर झाला. हुतात्मा स्मृती मंदिरात झालेल्या या नाटकाच्या पहिल्या प्रयोगातील कलावंत

बापू - **प्रदीप कुलकर्णी**
लता - **शोभा बोल्ली**
रूपा - **कु. अष्टपुत्रे**
दिग्दर्शन : **प्रदीप कुलकर्णी व शोभा बोल्ली**
नेपथ्य आणि प्रकाशयोजना - **गुरू वठारे**

या नाट्यप्रयोगास सोलापूर केंद्रावर प्रथम पारितोषिकासह सर्व विभागातील बक्षीसे मिळाली. अंतिम फेरीत याच कलावंतांच्या चमूने मुंबईतील यशवंत नाट्यगृहात प्रयोग केला. त्याला पाचव्या पारितोषिकासह सर्व विभागातील बक्षीसे मिळाली.

रजनीश जोशी

रूपक । रजनीश जोशी

- **प्रथम आवृत्ती** । ५ जून २०१८

- **रजनीश जोशी**
  २१०, दक्षिण कसबा, सोलापूर
  भ्रमणध्वनी : ९८५००६४०६६

- **मुखपृष्ठ** : पोरे ब्रदर्स
- **अक्षरजुळवणी** : पोरे ब्रदर्स
- **मुद्रणस्थळ** : मॉर्डन ऑफसेट, सोलापूर
- **किंमत** : ₹ ५०/-

अर्पण पत्रिका

कवी, नाटककार, नट, दिग्दर्शक, अनुवादक,
कादंबरीकार, चरित्रकार अशा अनेक रूपांबरोबरच नितळ
स्नेहभावानं काठोकाठ भरलेले
माझे ज्येष्ठ सन्मित्र दिवंगत
कविराज लक्ष्मीनारायण बोल्ली
यांना सादर अर्पण

प्रस्तावना

नाटकाच्या अंतरंगात प्रवेशताना...!

आजकालच्या नाटकांवर आपण जेव्हा दृष्टी टाकतो तेव्हा आपल्याला आधीच्या नाटककारांचं स्वाभाविक स्मरण होतं. त्यात तेंडुलकर, एलकुंचवार, मतकरी अशी नाटकाच्या प्रयोगात आणि संहितेत बदल करणारी महत्त्वाची नाटककार मंडळी दिसतात. त्यांनी जे रंगभूमीवरलं नाटक प्रयोगशील केलं, अधिक प्रेक्षकसन्मुख केलं, त्या गोष्टीची दखल घेतल्याशिवाय आपल्याला पुढं जाता येत नाही. कारण नाटकाच्या संदर्भातली ही प्रयोगशीलता अगदी संहितेच्या गाभ्याला भिडणारी होती. म्हणूनच विजयाबाई मेहता असोत, पं. सत्यदेव दुबे असोत यांसारख्या नाटकाच्या दिग्दर्शकांना नाटकाचे वेगवेगळे घाट बांधता आले. त्या काळात असलेलं नाटककार आणि दिग्दर्शक यातलं सौहार्द एकूणच नाट्यसृष्टीला नवं भान देणारं ठरलं. नवं नाटक म्हणजे संहितेचा नवा आशय-विषय आणि नवा प्रयोग म्हणजे इथल्या मातीतल्या लोककथा किंवा पुराणकथांचे वर्तमानातल्या स्थिती-गतींना जोडून घेणारे प्रयोगक्षम घाट. या नवेपणामुळेच त्याकाळातल्या आणि नंतरच्या प्रेक्षकांना व्यापक आकलनाची दिशा लाभली.

नाटकाच्या प्रयोगांचा विकास काळाच्या कुठल्याच टप्प्यावर कधीच थांबत नसतो. काळ पुढं सरकतो तशा नाटकाच्या संहिता आणि त्यांचे प्राणदार प्रयोग एक व्यापक कालसापेक्षता घेऊन पुढं पुढंच प्रवासत असतात. समाजाचा प्रवाह बदलत असतो. लोकमान्यता बदलत असते. विचारांच्या दिशा, समस्यांचे स्वरूप हे सतत बदलतच असते. हे बदल कधी स्थूल स्वरूपाचे असतात तर कधी अत्यंत सूक्ष्म आणि जटिल स्वरूपाचे असतात. समाजाच्या या प्रवाहाला जाणून घेणारा आणि स्वाभाविकतेनं त्याला व्यक्त करणारा नवा नाटककारांचा वर्ग पुन्हा निर्माण होत असतो. त्यात मकरंद साठे, तुषार भद्रे, अतुल पेठे, शफाअतखान वगैरे नाटककार आपल्याला ठळकपणे जाणवतात. मागच्या पिढीकडून पुढची पिढी केवळ कालसापेक्ष दृष्टिकोन बदलून घेत नाही. नवी आत्मनिष्ठा आणि समाजनिष्ठा यांचा एक कलात्मक समतोल साधण्याचे कामी ती करते. यातूनच आशयसंपन्न नाटकाची परंपरा निर्माण होत असते. कुठल्याही कलेच्या क्षेत्रातील परंपरा साचलेपण, एकारलेपण, ठराविकपण यांचे बांध ओलांडून पुढं वाहत राहते. तीच नवतेला जन्म देते. परंपरा मुळातून जाणल्याशिवाय नवता जन्माला येत नाही, हे प्रयोगशील कलावंताला सहजपणे जाणता येते.

रजनीश जोशी हे सोलापूरचे नाटककार आहेत. पण हे नाव काही सोलापुरातील नाट्यक्षेत्रापुरतं मर्यादित नाही. त्यांनी राज्यपातळीवरल्या कित्येक नाट्यस्पर्धांतून, एकांकिका स्पर्धांतून आपला सृजनशील सहभाग नोंदविला आहे. कित्येक पुरस्कारांचे ते मानकरीही ठरले आहेत. एखादं आशयघन नाटक लिहावं, त्याचा रंगभूमीवरला प्रयोग सुजाण प्रेक्षकांसाठी करावा, व्यावसायिक रंगभूमीसाठी करावा हे त्यांनी प्रयासाशिवाय पेललं आहे.

'रूपक' हे त्यांचं एक नवं नाटक आहे. एकूण सहा प्रवेशांच्या या नाटकात रंगभूमीवर वावरणारी अवघी तीन पात्रं आणि एक केवळ त्यांच्या संवादातून सूचित होणारं असं पात्र आहे. एवढ्या छोट्या आकाराच्या या नाटकात एक पूर्ण प्रयोग

सामावला आहे. अर्थातच पात्रसंख्येवर किंवा संहितेच्या लांबीरूंदीवर नाटकाचे मूल्यमापन करता येत नाही. आजकालच्या नाटकांमध्ये या नाटकांने प्रस्थापित केलेला आपला अक्षांश-रेखांश सुजाण प्रेक्षकाला निश्चित देखणा वाटावा असा आहे. 'रूपक' नाटक एका मध्यमवर्गीय जाणिवेतून उभं राहतं. पण या मध्यमवर्गीय माणसांमध्येच असणारा वृत्तीसंघर्ष नाटककाराला दिसतो, जाणवतो आणि व्यक्त व्हायला भाग पाडतोही. वृत्तीसंघर्ष कसा भावनाट्याला कारणीभूत होतो ते नाटकातल्या अखेरच्या सहज परंतू मार्मिक संवादांतून प्रेक्षकांसमोर येतं. पात्रांच्या वृत्तीतून उभं राहणारं हे भावनाट्य एका टोकाला जातं, माणूसपणाचं नवं दर्शन घडवतं ते नाटकातील लता-बापूच्या एका लोभापायी केलेल्या रूपातील हिंसक वृत्तीतून. नाटककारानं रूपाच्या तोंडचे संवाद जे लिहिलेले आहेत त्यातून वर्तमानाच्या कालसापेक्षतेची, समाजप्रवाहाच्या स्वार्थकेंद्री दिशेची, व्यक्तीच्या यशस्वी मूल्यांच्या प्रस्थापिततेची आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे परस्परांतल्या नात्यातल्या अवकाशाच्या अधोरेखनाची - एका नव्या रीतीची अत्यंत सूचक अशी बांधणी प्रेक्षकाला जाणवते. तो अस्वस्थ होतो. प्रश्नांकित होतो आणि अखेरीस अंतर्मुख होऊन 'स्व'शी जोडलेल्या साऱ्या नात्यांना नव्याने निरखू लागतो. हे या नाटकाचे संहितेच्या अंगाने असलेले यश आहे. आपले जगणे म्हणजे 'स्वेतरा'शी असलेले नाते असते. हाच खरंतर 'स्व'च्या असण्याचा अर्थ असतो. या नाटकातील रूपाचा एक संवाद पाहिला तर रूपाच्या वृत्तीचा आशय प्रेक्षकांना कळावा :

''पुरे झालं. मी तुला आईसारखी समजून मॉम म्हणत होते. तुझ्यात मला आई दिसते. माझ्या खऱ्या बापाला मी पाहिलं नाही. म्हटलं, हे चांगलं घर मिळालंय आपल्याला. माझ्या आईचीही काळजी संपली; इथं तुमच्याकडं मी राहतीय म्हटल्यावर ! वेळोवेळी मी पाँईटआऊट करत होते बॅप्सचा टच!''

स्पर्श केवळ शारीरिक नसतो, तो आपल्या अखंड असण्यातून जन्मतो. हे स्वार्थप्रेरित बुद्धीला कसं आकळावं? अशा रूपाच्या बुद्धितून संवाद घडत राहतात आणि अखेरीस एका वृत्तीसंघर्षाचे कारण ठरतात. हेच तर सामान्यांच्या आयुष्यात घडणारं नाट्य असतं. ते कृत्रिम कुठं असतं? त्याचा जन्म जगण्याच्या प्रवाहीपणातून होतो. हे नाटकातले नाटककाराचे वरवरचे संवाद-कौशल्य नाही तर कालसापेक्ष अभावाचा तो एक कलात्मक नाट्याविष्कार आहे. संहितेमध्ये शब्दांना, संवादांना, चिन्हांना, कंसातील सूचनांना केवढे महत्त्व असते ! रजनीश जोशींना त्याची पुरेपूर जाण आहे. या नाटकाचा प्रयोगही सादरीकरणास अनुकूल आहे. प्रयोगानुकूल नेपथ्य, मोजकीच पात्रसंख्या आणि अतिशय सुटसुटीत केवळ मनोविश्लेषणाच्या अंगानं विकसित होणारी संहिता. याहून दिग्दर्शकास अधिक काय हवे असते? नाट्यप्रयोगातील तीनही पात्रांना मात्र शब्दप्रधान संहितेची सार्थ जाणीव हवी. मानसिक आंदोलने संवेद्य करण्याची कायिक अभिनयक्षमता हवी. या आशयसंपन्न नाटकाचा प्रयोग व्यावसायिक बाजासह व्हावा, कारण हे एक प्रभावी प्रयोगमूल्य असलेले आजचे नाटक आहे.

हेमकिरण पत्की, सोलापूर

मनोगत

डोळे, नाक, कान, जीभ आणि त्वचा ! रंग, गंध, शब्द (श्रुती), रस आणि स्पर्श ! पंचेंद्रियातील या सर्वच घटकांचा वापर सृजनामध्ये नेहमीच होतो. स्पर्श ही खासगी गोष्ट. दोन व्यक्तींमध्ये घडणारी. पण त्यातून भावनांचे प्रकटीकरण होणे आणि त्यातून नाट्य जन्माला येणे विरळा. प्रेमानं, मायेनं, ममत्वानं, आस्थेनं, काळजीनं आणि तत्सदृश्य सद्भावानेनं केलेल्या स्पर्शाचं महत्त्व आहेच. मात्र, स्पर्शातील विकृतीतून संघर्ष निर्माण होतो, चिं.त्र्यं.खानोलकरांच्या 'अजगर'मधून तो प्रकट झाला आहे. 'रूपक'मधून त्याचं आणखी वेगळं स्वरूप मांडलं आहे.

आई-वडिलांनी आपल्या अपत्याला केलेल्या स्पर्शात अनेक अर्थ दडलेले असतात. मुला-मुलींचं आयुष्यच त्यातून उभं राहतं. विजयाप्रमाणेच पराभवातही ते उमेद देतात, जगण्याची प्रेरणा देतात. दुसरीकडं, आयुष्यभर एकमेकांच्या संगतीत जगलेल्या जोडप्यांना एकमेकांना हवा असलेला आश्वासक स्पर्श एकदा तरी करता येईलच असे सांगता येत नाही. आसन्नमरणावस्थेत असलेली पत्नी नवऱ्याकडून तिला हव्या असलेल्या स्पर्शासाठी आपला प्राण तगवून धरत असल्याचे उदाहरण नवे नाही. स्पर्श जीवनदायी असतो, तसा तो हिंसेला प्रवृत्त करणारा, विघातकही असू शकतो. स्त्रीच्या मनात पुरूषाच्या स्पर्शाचं नेमकं रूपक काय असेल हे सांगता येणं कठीण आहे. तो व्यक्तिगत अनुभूतीचा भाग आहे. त्यात संस्काराचा, मूल्याचा भाग असू शकेल. तसा तो नसेल तर गोष्टी कोणत्याही थराला जाऊ शकतात, हे वास्तव नाकारता येत नाही.

पिढी बदलली म्हणून मूल्ये बदलत नसतात. ती चिरंतन असतात. निरामय जगण्यासाठी मूल्यांचा आधार महत्त्वाचा ! 'रूपक' हे दोन पिढ्यांमधील अंतर दाखवणारे नाटक आहे. मूल्ये आणि संस्कारांना अधोरेखित करतानाच त्यांच्या अभावाने जे घडते ते किती विदारक असू शकते, याचे दर्शन त्यातून घडवले आहे. नाटकाची लांबी-रूंदी हा त्याचा पैस नसतो तर त्याचा आशय, त्याची व्याप्ती आणि काळाच्या कसोटीवर तो टिकून राहण्याची त्याची क्षमता महत्त्वाची. नाटकाची भाषा, रचना आणि मांडणी या तांत्रिक कौशल्याच्या गोष्टी आहेत. तथापि, या तंत्रकौशल्याचा अभाव अनेक दर्जेदार आशयाला मारक ठरतो. नाटक रंगमंचावर दिसतं त्याच्याआधी आणि त्याच्यानंतरदेखील घडत असतं. वेधक दृश्यं, भावनिक प्रसंग, उठावदार व्यक्तिरेखा गरजेच्या असतातच, मात्र नाटकाच्या कथावस्तूच्या आगेमागे घडणारा अवकाशदेखील तपासावा लागतो.

स्पर्श ही गोष्ट अत्यंत खाजगी आणि गुंतागुंतीची आहे. लहानपणीच पुरुषाच्या विशिष्ट स्पर्शाबद्दल एखाद्या मुलीच्या मनात निर्माण झालेली तिरस्काराची भावना तिच्या हातून टोकाची कृती तिच्या हातून घडवू शकतो. स्पर्शातून घडणाऱ्या संघर्षातील नाट्य शोधण्याचा हा प्रयत्न आहे.

'रूपक' नाटकात दोन पिढ्यांच्या मानसिकतेचाही उहापोह केला आहे. पहिली पिढी संस्कार आणि मूल्यभान जपणारी आहे. आपल्या पुढच्या पिढीतील मुलांनी आपण जसे जगलो, जी मूल्ये जोपासली ती त्यांनी जपावीत असं वाटतं. पण नव्या पिढीतील तरूणाईची मानसिकता वेगळी आहे. शारीरिक आणि लैंगिक भूक त्यांच्या दृष्टीने एकाच

पातळीवर आहे. आचार-विचाराच्या पातळीवर असे भेद मागच्या अनंत पिढ्यांपासून चालत आलेले आहेत, ते पुढेही बदलत राहणार, यात काय शंका? कोणतीही पिढी आपल्या भवतालाचा विचार करून पुढे जात असते. काल काय घडले याच्यावर ती थांबून राहत नाही.

'रूपक'चा प्रयोग सोलापूरात झाला. प्रदीप कुलकर्णी, शोभा बोल्ली आणि कु. अष्टपुत्रे यांनी आपापल्या भूमिका ताकदीने सादर केल्या. त्यानं रसिकांना आणि मलाही समाधान दिले. गुरू वठारे या प्रयोगाचे सूत्रधार होते. नाटकाच्या निर्मितीमूल्यात कोठेही तडजोड न करता त्यांनी हा प्रयोग सुविहितपणे घडवून आणला. त्यामुळे या सर्वांचेच मनःपूर्वक आभार.

रविकिरण पोरे आणि निशांत पोरे हे प्रगल्भ कलावंत आहेत. समकालिन घडामोडींशी ते केवळ संबद्ध आहेत, असे नाही तर त्यांच्या कलाजाणिवाही प्रगल्भ आहेत. 'रूपक'चे पुस्तक होण्यामागे त्यांचे मोठे योगदान आहे. निशांतने आशयसमृद्ध असे मुखपृष्ठ केले आणि पुस्तकाची देखणी मांडणीही केली. कवी हेमकिरण पत्की हे माझे जवळचे मित्र. नाटक आणि नाटककाराला समजून घेण्याची त्यांची रीत न्यारी आहे. 'रूपक' वाचून त्यांनी अतिशय अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहिली आहे. या तिघांचे मी ऋण व्यक्त करतो. कविराज लक्ष्मीनारायण बोल्ली हे माझ्यापेक्षा वयाने मोठे, पण आमच्या पंचवीस वर्षांच्या मैत्रीत त्यांनी आपल्या वयाचे आणि कवित्वाचे मोठेपण कधीच जाणवू दिले नाही. निरपेक्ष स्नेहभाव आणि अकृत्रिम प्रेमाने आमच्यातील जिव्हाळा समृद्ध झालेला होता. हे पुस्तक त्यांना अर्पण करताना अंतःकरण जड झाले आहे.

नाट्यलेखनाच्या कालखंडात आणि एकूण प्रापंचिक व्यवहारात माझी पत्नी रेवतीने दिलेली साथ अमूल्य अशीच आहे. गुरूराज आणि गिरिराज या माझ्या मुलांनीही माझे नाट्यवेड समजून घेतले आहे, याचा मुद्दाम उल्लेख आवश्यक आहे. नाटकाची संहिताही वाचकांना आवडेल, अशी अपेक्षा आहे.

रजनीश जोशी, सोलापूर

स्पर्शाची भाषा !

मानवी जीवनातील स्पर्शाचे महत्त्व वेगळं सांगायला नको. स्त्रियांच्या वाट्याला जगणं फुलवणारे स्पर्श जसे असतात तसे जगणं उद्ध्वस्त करणारे स्पर्शही होतात. त्याबाबतच्या अनेक घटना आजही आपण रोज ऐकतो, वाचतो. याच स्पर्शाच्या अनुभूतीचं 'रूपक' किती दाहक रूप धारण करू शकतं याचं दर्शनरजनीश जोशी यांनी या नाटकातून घडवलंय. नको त्या स्पर्शाचा किळसवाणा अनुभव घेतलेली एक तरुणी अपत्य प्रेमासाठी आसुसलेल्या वडिलांच्या वयाच्या व्यक्तीच्या मायाळू स्पर्शाचा विपरित अर्थ काढते. असं म्हणतात की स्त्रीला पुरुषी स्पर्शाची भाषा चटकन कळते. पण इथं मात्र त्या तरुणीला कटू अनुभवामुळे त्यातील माया कळत नाही. आणि मग सुरू होतं एक भीषण नाट्य. माणुसकीवरचा विश्वास उडून जावा असं जाळं विणलं जातं. त्याचा शेवट भयानक होतो. त्यातून अजून एक सत्य समोर येतं आणि ती तरुणी उध्वस्त होते. प्रेक्षक सुन्न होऊन जातो, हळहळतो.

पकड घेणारी संवाद शैली, उत्कंठा वाढवणारे कथानक आणि तीनच पात्रांनी घडवलेले नाट्य ही या नाटकाची बलस्थानं आहेत. या नाटकातील लताची भूमिका साकारत असताना मला खूप समाधान लाभले.

शोभा बोल्ली, सोलापूर

स्पर्शाचे भावनाट्य !

'रूपक' हे नाटक एका वेगळ्या विषयाला हात घालते. या नाटकात स्त्रीचे स्पर्शज्ञान आणि त्याचा तिला होणारा त्रास हा विषय घेऊन त्याची सुरेख मांडणी करण्यात आली आहे. 'रूपक'मधील बापूची व्यक्तिरेखा साकारताना एक कलाकार म्हणून खूप छान अनुभव आला. या नाटकाने राज्य नाट्य स्पर्धेच्या प्राथमिक आणि अंतिम फेरीत सगळी पारितोषिके पटकावली. 'रूपक' या नाटकाच्या प्रयोगनिर्मितीत माझी आंतरिक जवळीक होती. या नाटकाने मला खूप समाधान दिले.

प्रदीप कुलकर्णी, पुणे

या नाटकाचा प्रयोग करण्यापूर्वी लेखी परवानगी घेणे बंधनकारक आहे.
परवानगीशिवाय प्रयोग केल्यास कायदेशीवर कारवाई केली जाईल.
परवानगीसाठी संपर्क : **रेवती जोशी, २, सुंदर कॉंप्लेक्स,**
होटगी रोड, गैबीपीर मशिदीसमोर, सोलापूर - ४१३००३

– अंक पहिला –

(पडदा उघडतो तेव्हा रंगमंचावर उच्चमध्यमवर्गीय थाटाचे घर दिसते. उत्तम सजावट केलेली. फर्निचर उंची आणि नजरेत भरणारे. मंचाच्या उजव्या कोपऱ्यात एक बिछाना, समोर पडदा वगैरे... थोडक्यात तिथं एखाद्या व्यक्तीचं स्वतंत्र राहणीमान असावं असं नेपथ्य. बापू साधारण पन्नाशी ओलांडलेला आणि लता त्याची बायको पन्नाशीच्या घरातली. दोघेही उत्साहानं तयारी करतायत. गौरीपूजनाचा दिवस आहे. दोघांची धांदल सुरू आहे.)

बापू : अगं, ते तोरण नीट बांधलंस का दारावर ?

लता : (ती कामात मग्न) सोफ्यावर ठेवलंय, तेवढं लावा प्लीज !

बापू : काय हे, गौरी पूजना दिवशी सकाळीच तोरण लावायला हवं.

लता : सकाळीच काढून ठेवलंय, पण तू श्वास घेऊ देशील तर ना ?

बापू : मी ? मी काय केलं ? (तोरण घेऊन लावायला लागतो) पंचवीस वर्ष झाली असतील ना या तोरणाला ?

लता : जास्तच. विणलेलं ते तोरण दारावर लागायची ही फक्त २५, २६ वी वेळ असेल.

बापू : असं कसं ?

लता : फक्त गौरीपूजनाच्या दिवशीच तर लावतो ना आपण.

बापू : (घडयाळ पाहत) रूपा नाही गं आली अजून !

लता : येईल. गौरी आगमनापर्यंत येते म्हणालीय.

बापू : आज तिनं सुटी घ्यायला हवी होती.

लता : कसं शक्य आहे ? बीपीओमध्ये आहे म्हटलं ती. कधी कॉल येईल सांगता येत नाही.

बापू : मला का माहिती नाही ते ? पण आज सणाचा दिवस त्यातून ती मुलगी. मग तिला सुटी द्यायला पाहिजे कंपनीनं.

लता : गेला तो जमाना. आता सगळे सण उत्सव कंपनीतच साजरे होतात.

बापू : ते ही बाकी खरंच म्हणा. रूपानं यंदा वाढदिवसही चक्क कंपनीतच साजरा केला.

लता : (गौरीच्या मुखवटयाचं तबक घेऊन त्यात तांदूळ वगैरे पसरत) हे एक बाकी बरंय म्हणायचं. सगळे एकमेकांना सांभाळून घेतात. वाढदिवस साजरे करतात, एकमेकांची सोबत करतात.

बापू : (तिला तबकात वस्त्र घालून देत) मुलं-मुली असा भेद नाहीच राहिला हल्ली. कंपनीही तो करत नाही आणि कर्मचारीही !

लता : बाकी बापू, 'व्हीआरएस' घेतल्यापासून तू अगदी पोक्त म्हाताऱ्यासारखा बोलायला लागलास. कॉलसेंटरमध्ये किंवा कुठल्याच कंपनीमध्ये जेंडरचा विचार नाही केला जात.

बापू : (म्हातारा शब्द त्याला लागलाय) लता, मी अगदीच काही म्हातारा झालेला नाहीये. तुला बघायचंय का - -

लता : हं, गौरीपूजनाची तयारी कर. म्हणे बघायचंय का ? ही रूपा कधी येते कुणास ठाऊक ?

बापू : मी फोन लावतो तिला. (तो मोबाईल लावतो. रिंग वाजते बराचवेळ, ती उचलत नाही. तो अस्वस्थ)

लता : काय झालं ?

बापू : अग नाही उचलत ती.

लता : कामात असेल.

बापू : (ओरडत) कामात असेल तर ती आता येईल कशी ?

लता : शांतपणे काम संपवण्याची घाई करत असेल. म्हणूनच फोन नाही घेत ती.

बापू : (तो अस्वस्थ) तुला सांगितलंय का तिनं तसं ?

लता : सांगायला कशाला पाहिजे ? कळतं ना. ती बिझी आहे म्हणून फोन नाही उचलत. मी नव्हते का करत तसं ?

बापू : तू ? लता, तुझी कंपनी ती केवढी, तुझी धावपळ ती काय, उगाच रूपाशी नको तुलना करू स्वत:ची.

लता : (मिश्किलपणे) का ? रूपाची कंपनी मोठी म्हणून तिची पत जास्त आणि माझी छोटी -

बापू : काही तरी बोलू नकोस. माझा कंट्रोल सुटतोय.....

लता : काय कारण आहे कंट्रोल सुटायचं ? ती येईलच आत्ता.

बापू : असं काही तरी सांग ना. आजचं गौरीपूजन तिच्याकडून करून घ्यायचं ठरवलंय मी.

लता : किती वेळा सांगणारैस तेच. माझी तयारी झालीय.

बापू : मुखवटे कुठं आहेत ?

लता : ठेवलेत आत देवघरात.

बापू : आणि गणपती ?

लता : आता गणपतीची पूजा आहे का गौरीची ?

बापू : पूजा गौरीचीच आहे, पण गणपती बाजूला हवाच? ठेवलास का ?

लता : ठेवते. (आली गवराई अंगणी, तिला लिंबलोण करा,' असं पुटपुटत आत जाते.)

बापू : कमाल आहे तुझी ? गौरीच्या बाजूला गणपती ठेवायचं लक्षात कसं नाही तुझ्या ?

लता : (आतून) तू तो मखरातून हलवला नाही ना म्हणून.

बापू : (पुन्हा फोन लावतो तो उचलला जात नाही) छे ऽ काय करावं या पोरीला ?

लता : (येते) चल आपण बसवून टाकू गौरी.

बापू : (रागाने) काहीतरी बोलू नको. रूपा बसवणार आहे.

लता : तिला यायला उशीर होतोय तर आपण मुहूर्त का टाळायचा ?

बापू : तू जरा शांत बस. मला बघू दे काय झालं ते. (बापू फोन लावतो. रिंग दारातच वाजायला लागते. मोबाईलची रिंग आणि दारावरची बेल एकदम वाजायला लागते.)

बापू : (पळत जाऊन दार उघडतो, दारात रूपा) काय हे रूपा, किती वेळ? (तिची बॅग किंवा मोठी पर्स जे काही असेल ते घ्यायला लागतो.)

लता : बघ, आली की नाही वेळेवर. उगाच गोंधळ घालत होतास.

रूपा : अरे, अरे ऽ ऽ राहू दे बॅप्स ! हे काय करतो ?

बापू : अग तुझी बॅग ठेवतो आत. तू पळ, पटकन फ्रेश हो. पूजा करायचीय.

लता : मी करते बाकीची तयारी ! (आत जाते)

बापू : हो तू लाग कामाला. चल रूपा !

रूपा : ए बॅप्स,मी थकलीय रे. थोडा वेळ थांब. उगीच गडबड नको करूस.

बापू : ते काही नाही (तिला ढकलत) आधी फ्रेश हो. तुझ्या हस्ते करायचंय पूजन.

रूपा : (ऐसपैस बसत) ए चल, काही तरी काय ?

बापू : तुला मी सकाळीच सांगितलं होतं.

रूपा : (ती रिमोटनं टी व्ही ऑन करते) तेव्हा मी तुला गप्प करण्यासाठी हो म्हणाले होते.

बापू : उगाच काही तरी बोलू नको. चल तयार हो !

रूपा : (चॅनल बदलत) काय रे तुझं हे ऽ ! मला जरा बसू दे !

(आतून लता येते. पूजेचं सामान आणि तसंच काही तिच्या हातात.)

लता : गौर आली गौर आली
सोन्या मोत्याच्या पावलांनी
सगळीकडे दृष्टी फिरव
आनंदी आनंद कर .....

बापू : (लताकडं पाहत) ओ. के. झाली ना तयारी. आता मुखवटे आत न्यायचे ना ?

रूपा : (टी व्ही पाहत बसलीय) मॉम, तू सांग ना बॅप्सला.

लता : कोण आली गौरी आली, तिला लिंबलोण करा ऽ ऽ

बापू : (रूपाकडं येत) रूपा, बेटा पुरे हं आता. बंद कर टीव्ही.

रूपा : (टीव्ही पाहत) बॅप्स, अरे ती आमच्या कंपनीतली रेखा - - -

बापू : (रिमोट काढून घेत, टीव्ही बंद करतो) बघू नंतर. तू तयार हो बी क्विक ! तिला उठवायला लागतो

रूपा : (नाराज) हे ग काय मॉम. हा मला विश्रांती घेऊ देत नाही.

लता : एवढं म्हणतोय तर हो ना पटकन तयार.

रूपा : (तिची नक्कल करत) 'हो ना पटकन तयार ऽ ऽ ' बॅप्सच्या हाताखाली पूजा करणं म्हणजे सोपी गोट आहे होय ? हे असं कर, फुलाला गंधाक्षता लाव. हे आणि ते. छे बाई ऽ ऽ

बापू : (तिला धरून) रूपा, चर्चा नंतर, मुहूर्त टळतोय. जा तयार हो.

(तिला आत ढकलतो)

लता : (उंबऱ्यात रांगोळीसारखी करत) तिची इच्छा नसली तर बळजबरी कशाला करतोस ?

बापू : इच्छेचा काय प्रश्न ? आं ? पूजा करायला इच्छा लागते का ?

(रूपा आतून फोनवर बोलत येते.)

रूपा : अरे हो रे. नक्की. मी येते म्हटलं की येते. कोण ? तो ?

(बापूकडं पाहते) त्याचं काही नाही. मी पाहते ते. किती वेळात

यायचं ? अर्ध्या तासात ? चल मी फ्रेश होते.(फोनवर) हं हं बोल. काय ? काय सांगतोस ? ओ माय डियर राघू ? हाऊ स्वीट ! ए, खरं सांगतोयस ना ? की परवा सारखी गंमत करतोयस ? रंग कोणताय ? लालम लाल. मस्तच ! मला खूप आवडतो लाल रंग ! हो आणि रेड वाईनही ! (बापू अस्वस्थ) ए चल, मी येतेच पटकन, राईट ? ओक्स, सी यू सुन !

बापू : (कमरेवर दोन्ही हात ठेवून) रूपा ऽ ऽ !

रूपा : येस बॅप्स, जस्ट वेट ! (आत जाते)

बापू : ही पोरगी म्हणजे कमाल आहे. इतका वेळ मरगळून गेली होती. हाताला धरून उठवायला लागत होतं आणि आता ऽ टणाटण उडया मारतीय.

लता : राघूचा फोन होता ना !

बापू : अगदी वेळेवर आला त्याचा फोन. पोरगी फटकन तयार झाली.

लता : पूजेला लांबण नको लावू. लगेच उरक. तिला नाही आवडत जास्त वेळ घालवलेलं ?

बापू : नेहमीचे विधी तर करावे लागतीलच ना ?

लता : किती अडकतोस कर्मकांडात. मॅनेजरच्या पोस्टवरून रिटायरमेंट घेतलीस असं कुणाला खरं वाटेल का ?

बापू : 'व्हीआरएस' म्हण. वॉलेंटियरी रिटायरमेंट !

लता : काही काही जण अकाली प्रौढ असतात, तशीच की ती अकाली रिटायरमेंट !

बापू : तू सारखं सारखं माझ्या रिटायरमेंटवर का बोलतीयस ?

लता : आता रिटायर झाला म्हणून! त्यात इतकं वाईट काय वाटून घ्यायचं?

बापू : तुला म्हणजे - - (रूपा येते तिच्याकडं जात) हं, चल रूपा.

रूपा : (घाईघाईत) मॉम, मला फटाककन् चहा देतेस. आय एम टायर्ड !

लता : यू आर टायर्ड ॲन्ड ही इज रिटायर्ड !

बापू : नसत्या कोट्या करत बसू नकोस. रूपा ऽ

रूपा : त्याच्याकडं दुर्लक्ष करत मॉम, मी काय विचारतीय ? तू देणार आहेस का मी बाहेरच घेऊ ?

बापू : शू ऽ ऽ रूपा ! काय बाहेर ? तुला पूजा करायचीय.

रूपा : मला चहा घ्यायचाय. मॉम ऽ

लता : (हातातलं काम सोडून) देते बाई - -

बापू : काही नको. ही काय चहाची वेळ आहे का ?

रूपा : मग, चहाची वेळ कोणतीय ?

बापू : रूपा वाद नको घालूस. मी सकाळपासून तुझी वाट पाहतोय.

रूपा : आणि मी आलेच नसते तर... मॉम, चहा ऽ ऽ
(लता आत निघते, तिला थांबवत)

बापू : हे बघ रूपा, पटकन पूजा करू की मग चहाच काय, नाश्ताही करू ?

रूपा : मला नाही वेळ. मी निघालीय.

लता : अगं चहा करते घेऊन जा ना.

रूपा : (गडबड करत) ए जाऊ दे आता. मी पळते.

बापू : (तिला थांबवत) तुला तसं जाता येणार नाही.

रूपा : (गमतीनं) मग कसं जाता येईल ?

बापू : (अस्वस्थ) गमतीची वेळ नाही - - -

रूपा : हो ना. मला गडबड आहे.

बापू : अगं पण पूजा - - -

रूपा : ती तू घे करून !

बापू : पण ही घरातल्या बायकांनी करायची पूजा आहे.

रूपा : ओ ऽ शिट ऽ काय रे तुझं हे. मला नाही वेळ .

बापू : (तिला अडवत) थांब रूपा. मी सांगतोय ना तुला

रूपा : ए चल, मी पळते.

बापू : रूपा बेटा, अग मुलीच्या हातून पूजा व्हावी म्हणून -

रूपा : बॅप्स ! जस्ट किप क्वायेट ! ओ के ?

बापू : रूपा ?

रूपा : येस. उगाच अडवू नको. राघू माझी वाट पाहतोय.

बापू : मी सकाळपासून तुझी वाट पाहत होतो.

रूपा : मी काय करू मग ?

बापू : अगं असं काय करतेस...

रूपा : चल निघते.

बापू : केविलवाणा, तरीही निर्धाराने अग मुलीनंच ही पूजा करायची आईबरोबर !

रूपा : हे बघ बॅप्स, उगाच भंकस नको. (घाईनं पळते, दारातलं तबक तुडवून जाते. बापू हतबल, चहाचा कप घेऊन आलेली लता पाहत राहते)

अंधार

प्रवेश पहिला समाप्त

प्रवेश दुसरा

(स्थळ तेच : रूपाच्या बोलण्यानं बापू नाराज झालेला आहे. लता त्याला खुलवण्याचा प्रयत्न करतीय. वेळ दुपारची)

लता : बापू , हे बघ.

बापू : हं ..... ?

लता : (लॅपटॉपवर ओपन केलेले फोटो दाखवत) बापू, हा तुझा फोटो श्रीनगरचा आहे ना ?

बापू : (फारसा उत्साह नाही) कोणता ?

लता : (लॅपटॉप पुढं करत) हे बघ. हा.

बापू : नाही ग, तो पठाणकोटचा आहे.

लता : हां, म्हणजे धर्मशालेकडं तुमची कॉन्फरन्स होती त्यावेळचा ना ?

बापू : हो.

लता : पण पठाणकोटला काही एवढी थंडी नसते, म्हणजे फोटोत तू ज्या अवतारात आहे त्यावरून- -

बापू : त्यावर्षी 'कोल्ड वेव्ह' होती ना उत्तर भारतात. पठाणकोटला शुन्यावर गेलं होतं तापमान.

लता : (तो बोलू लागलाय हे पाहून आणखी उत्साहानं) करेक्ट. अरे हा बघ, हा बंजाऱ्याच्या पोशाखातला -

बापू : बंजाऱ्याच्या नाही. खजियारला काढलाय तो. लोकल ट्रॅडिशनल ड्रेसमध्ये.

लता : बाकी लॅपटॉपमुळं हे फोटो केव्हाही पाहता येतात. मुख्य म्हणजे अल्बम सांभाळत बसायची गरज नाही.

बापू : सीडी जपून ठेवावी लागते ना.

लता : ती काय आपली सीडी लायब्ररी केवढी तरी मोठी आहे.

बापू : रूपा कुठं ऑफिसला गेलीय ?

लता : आज नऊची शिफ्ट होती तिची.

बापू : पोरीचं स्वतःचं 'लाईफ' म्हणून राहिलं नाही. सतत धावपळ ! कठपुतळीच झालीय तिची.

लता : तू फार विचार करू नकोस. (कडवटपणे)

बापू : अग ताण किती पडतो तिच्यावर. आणि आपण विचार नाही करायचा तर कुणी करायचा ?

लता : प्रत्येकाला आपापल्या पध्दतीनं जगण्याचं स्वातंत्र्य द्यायला हवं.

बापू : मी कुठं नाही म्हणतोय, स्वातंत्र्य हवंच, पण मर्यादाही हव्यातच ना?

लता : तू हेकेखोरपणा सुरू केलास म्हणून ती ही संतापली.

बापू : अगं, मी काही फार वेळ घेणार होतो का तिचा ? तू ही जगावेगळं असल्यासारखं सांगतीयस मला.

लता : नाही आवडत तिला पूजा-बिजा, तर आपण आग्रह का करायचा म्हणते मी ?

बापू : पूजा करणं म्हणजे केवळ कर्मकांड नाहीये लता. हां, आता असतो पूजेचा थोडा विधी, पण त्यात भाव असतो, श्रध्दा असते. तुम्ही भावनाहीन, श्रध्दाहीन जगाल तर जगण्यातच काही अर्थ नाही.

लता : हे बघ, कुणी कसं जगावं याचं दडपण आपण आणू शकत नाही. रूपानं तू म्हणशील तसं वागावं हा तुझा वेडगळ हट्ट आहे.

बापू : वेडगळपणा काय आहे त्यात. तुझा हा लॅपटॉप ओपन करायची एक पध्दत आहे की नाही ? आधी हे बटन पुश करा, मग हे, मग तो कर्सर ! हा विधीच आहे. तो करता ना तुम्ही ?

लता : कोणतीही गोष्ट कशाशीही जोडू नकोस. भक्ती, श्रध्दा वेगळी आणि लॅपटॉप वेगळा !

बापू : लॅपटॉपवर म्हणजे तुमच्या कामावर तुमची श्रध्दा आहे ना ? ते करण्यासाठी काही प्रोसेस आहे. तसं निरामय जगण्याची प्रोसेस म्हणजे पूजा आहे, कळलं ?

लता : आपलं तत्वज्ञान आपल्यापाशी ठेवावं, दुसऱ्यावर लादू नये.

बापू : जगण्याच्या अनुभवातून निर्माण झालेलं तत्वज्ञान आहे ते, इतरांना सांगायला काय हरकत आहे ? माणसं शहाणीच होतील ना त्यानं ?

लता : विचारलं तर सांगावं तत्वज्ञान ! आणि अनुभवाचं म्हणशील तर तो स्वत: घेण्यातच अर्थ आहे. दुसऱ्याच्या अनुभवावर तिसरा शहाणा होईल हे तुझं म्हणणं मला पटत नाही.

बापू : 'अनुभवाचे बोल' नावाचा प्रकार असतो की नाही काही ?

लता : आवश्यकता असेल तर बोलावं माणसानं.

बापू : 'बोलणं' हा उपजीविकेचा व्यवसाय झालाय हल्ली. अशा बोलण्यात अनुभवाचा भाग हवाच ! रूपाचं काम नाही तरी हेच आहे.

कॉलसेंटरमध्ये बोलत राहायचं.

लता : हे बघ बापू, कंपनीत काय आणि कसं बोलायचं याचे धडे गिरवलेत रूपानं ! त्याच्या बळावरच तिला ही नोकरी मिळालीय. फक्त कुठं कसं बोलावं याचा पोच नाहीये.

बापू : तू पुन्हा आठवण नको करून देऊ तिच्या बोलण्याची.

लता : आठवण करून देण्याचं कारणच नाही, तू अस्वस्थ आहेसच ना ?

बापू : माझ्या अस्वस्थतेचं ते कारण नाही-

लता : मग काय आहे ?

बापू : पोरीला जगाचा अनुभव नाही -

लता : तो देण्याचा मक्ता तू घेतलायस का ?

बापू : मक्ता घेण्याचा प्रश्न नाही, आपली काही जबाबदारी आहे ना ?

लता : नसत्या जबाबदाऱ्या नकोस घेऊ ओढवून.

बापू : (खवळत जातोय क्रमाक्रमानं) नसत्या जबाबदाऱ्या काय ? तिच्या भल्याचं नको का पाहायला ?

लता : तू जरा जास्त वाहवत जातोयस ?

बापू : वाहवत जातोय ? म्हणजे ?

लता : तरूण मुला-मुलींचं आपलं जग असतं. त्यात ढवळाढवळ केलेलं आवडत नाही त्यांना !

बापू : ढवळाढवळ करायला मी काय फिरतोय का तिच्या मागं मागं. माझ्या काही अपेक्षा आहेत त्या तरी नकोत का सांगायला ?

लता : तू कोण अपेक्षा ठेवणारा ?

बापू : भंपकपणा करू नकोस ; मी कोण म्हणे ?

लता : भंपकपणा काय आहे यात ?

बापू : तिचं भलं बुरं आपण पाहायला हवं -

लता : उगाच काहीतरी बडबडू नकोस !

बापू : बडबडणं नाही, मी खरंच सांगतोय !

लता : तुला कोणी विचारलंय का ?

बापू : माझ्या बोलण्याला काही किंमतच नाही, असा याचा अर्थ आहे.

लता : स्वत:ची किंमत ठेवून घ्यावी लागते माणसानं ! एका नॅशनालाइज्ड बँकेचा मॅनेजर होतास तू.

बापू : हॅ ऽ शोरूममधल्या पुतळ्याच्या गळ्यात किमतीचं लेबल असतं, तसं लावून जगणं शक्य नाही मला. हे घर म्हणजे शोरूम नाही आणि आपण पुतळे नाही आहोत त्यातले ! प्रत्येक गोष्ट तोलून मापून कधीच केली नाही मी, मला ते जमणारही नाही.
(बेल वाजते, रूपा आलीय. लता दार उघडते.)

रूपा : येस मॉम, बॅप्स कुठंय ?

लता : तो काय समोर तर आहे तुझ्या.

रूपा : (उत्साहानं फसफसलेली) बॅप्स, बॅप्स ऽ ऽ
(बापूचा प्रतिसाद नाही. तो रागावलेलाय तिच्यावर) ओ बॅप्स, तू अजून दुर्मुखलेलाच का ? अरे, कंपनीत किनई गंमत झाली - -

बापू : सांग तुझ्या मॉमला !

रूपा : (खळखळून हसते) हे मात्र अगदी लहान मुलासारखं झालं. बॅप्स, किती रे लडदू तू !

लता : लडदू ? रूपा काय बोलतेस ?

रूपा : मॉम, लडदू म्हणजे लाडू खाणाऱ्या मुलाच्या वयाचा.

लता : मग हरकत नाही. आम्ही ऐतखाऊ माणसाला म्हणतो लडदू !

रूपा : बॅप्स, बघ मॉम काय म्हणते ते.

लता : रूपा, अजिबात बोलू नको. आमच्यात भांडणं लावतीयस का ?

रूपा : भांडणं काय? मी लाडू खाणारा लाडोबा म्हणत होते तर तू लडदूचा वेगळाच अर्थ सांगितलास.

लता : रूपा, बापू चिडलेलाय अजून. माझ्याशीही नीट बोलत नाहीये ग तो.

रूपा : (लॅपटॉप पाहत) उफ, हे फोटो. मॉम काय मस्त आहे ग हा फोटो.
(बापू तसा निवळत चाललाय)

लता : (उत्साहाने) हां, हां, तो होय. तो ना लडाखचा आहे.

बापू : शूः ऽऽ उगीच काहीही काय सांगतेयस, मी लडाखला कधी गेलो होतो ?

लता : घ्या,मी कुठं म्हटलं तसं? मी फक्त फोटो लडाखचाय असं म्हणाले!

रूपा : क्या बात है ! मॉम, बर्फाच्या या लाद्या खरोखर किती फ्रेश वाटतायत ना. लडाखला जायला पाहिजे एकदा.

बापू : तो फोटो लडाखचा नाहीये. जवळ जाऊन पाहत हॅं, यात कुठंय बर्फ ? हा तर जम्मूचा आहे. रूपा ऽ ऽ मला बनवतेस ?

रूपा : काय करणार ? एक माणूस आमच्याशी बोलायलाच तयार नाही. मग त्याला आणला फिरवून लडाखला !

बापू : (उत्साहाने) सगळी हिमशिखरं सारखी दिसतात, रूपा, तू हा फोटो पाहा. (तिच्या अंगाला स्पर्श होतोय) हा ना रोहतांग पासचा आहे !

रूपा : ब्युटिफूल ऽ !

लता : तू गंमत सांगणार होतीस ना रूपा ?

रूपा : आठवून येस ! बॅप्स, झालं काय माहिती ? कंपनीत जॉनी नावाचा कलिग आहे आमचा. मॉम, त्याचं मूळ नाव आहे मल्हारी. पण 'बीपीओ' कल्चरमध्ये सूट नाही होत म्हणून त्यानं 'जॉनी' नाव सांगायला सुरू केलं. आजच कळलं ते गुपित !

लता : त्यात काय ? अलीकडं अशी टुमच निघालीय. खूप जण नावं तरी बदलतात किंवा आडनावं तरी.

रूपा : नावं बदलायचं कळलं, पण आडनावं बदलायचं कारण काय ?

लता : रूपा, अग आडनावांवर बराच खेळ असतो. कोणत्याही सरकारी ऑफिसात जा. आडनाव पाहतात. आपल्या जवळचं वाटलं की काम झटकन होतं. आणि लांबचं वाटलं की साध्या कामालाही दफ्तरदिरंगाई !

रूपा : ए ऽ म्हणजे काय मला नाही कळलं. नीट सांग ना.

बापू : (तिला थोपटून) म्हणजे बघ रूपा, आपल्या जातीजवळ जाणारं आडनाव असलं, थोडक्यात आपल्या जातीचा असेल तर काम फत्ते, नाहीतर टाका जुळतील असे पत्ते !

लता : आणि हा अगदी सर्वसाधारण अनुभव आहे.

रूपा : त्यासाठी आडनाव बदलायचं ?

लता : हो. आणि ते इतकं बेमालूम की आडनाव वाचून जात कळूच नये माणसाची.

बापू : किंवा तो चकला तरी पाहिजे. आमच्याकडं एक 'कोसला' म्हणून क्लार्क होता. मी विचारलं त्याला भालचंद्र नेमाडेंची 'कोसला' तुमची कोण, तर म्हणाला त्यावरूनच पडलंय आमचं ते आडनाव.

रूपा : म्हणजे ?

बापू : म्हणजे त्यानं ते बदलून घेतलं होतं. 'कोसला' कादंबरी वाचून !

लता : आमच्याकडं 'फ्रेंडी' आडनावाचा माणूस होता.त्याचंही असंच होतं !

रूपा : माणसं असं का करतात कुणास ठाऊक !

बापू : पूर्वी टोळ्या असत अरण्यात. एका टोळीचं दुसऱ्या टोळीशी जमत नसे. तसंच आता माणसांच्या टोळ्या व्हायला लागल्यात. आपली टोळी कशी संघटित आहे ते दाखवायचं, तोडफोड करायची, दुसऱ्याला त्रास द्यायचा आणि हवं ते पदरात पाडून घ्यायचं.

रूपा : हा तर रानटीपणा झाला.

बापू : तेच रानटीपण पुन्हा उगवून आलंय.

रूपा : त्या जॉनीचंही असंच झालं.

लता : अग हो, त्याची गंमत राहिलीच की.

रूपा : ऐक ना. सकाळी एक धोतर घातलेला राठ माणूस आला कंपनीत. आमच्या विभागात येऊन 'मल्हारी आहे का', म्हणून विचारू लागला. मला काय माहित, मी 'आमच्याकडं कुणी मल्हारी नाही' म्हणून सांगितलं. तेवढ्यात जॉनी पळत आला. त्या माणसानं 'ह्यो काय मल्हारी', असं मला म्हटलं आणि जॉनीनं त्याला पुढं बोलू न देता पटकन बाहेर नेलं. जॉनीचं नाव मल्हारी आहे हे आम्हाला त्यामुळं कळलं.

बापू : मल्हारीपेक्षा जॉनी नाव फॅशनेबल वाटलं त्याला.

रूपा : गंमत पुढेच आहे. आम्ही जॉनीला विचारलं की तो कोण आहे, तर म्हणाला, 'गडी आहे आमच्या फार्मवरचा'. आणि खरंच त्याची प्रोफाईल इतकी परफेक्ट होती. त्याचं रांगडेपण दिसून येत होतंच. बट आय एम सॉरी टु से, दॅट मॅन वॉज हिज फादर ! आपल्या वडलांनाच तो चक्क फार्मवरचा गडी म्हणाला. सो सॅड !

लता : तुमच्या मॉडर्न जगात त्याला त्याचा बाप ऑड वाटला. तुम्ही टिंगल कराल त्याची असं वाटलं त्याला.

रूपा : नाही तरी मल्हारी नाव किती कॅची आहे जॉनीपेक्षा. व्हेरी पिटी.

बापू : आपल्या नावातला गोडवा कळला पाहिजे. आता राघू हे नाव - -

लता : राघू नाव किती तरी गोड आहे.

रूपा : मॉम ऽ ऽ ! नुसतं नाव नाही, राघू नावाचा तो तरूणही गोड आहे नावासारखा.

बापू : राघू म्हणजे राघव. राघव हे श्रीरामाचं नाव आहे.

लता : आम्ही पोपटाला राघू म्हणायचो.

रूपा : तुम्ही जे म्हणताय ते सगळं राघूमध्ये आहे. तो हॅण्डसम आहे, रूबाबदार आहे. त्याची 'ओरीटोरी' अफलातून आहे. एका मिनिटात समोरच्या माणसावर छाप पाडतो तो.

लता : ते त्याचं कौशल्य तू न सांगताच कळलंय आम्हाला.

रूपा : हे गं काय मॉम ? तो खूप हुशार आहे. कोणत्याही परिस्थितीचा फायदा कसा घ्यायचा हे बरोबर समजतं त्याला. सगळे बॉस त्याच्यावर खूष आहेत.

बापू : आणि रूपा बॉसही फिदा आहेत, एम आय राईट ?

रूपा : ॲब्स्यल्यूटली! तुम्ही त्याला पाहाल, त्याच्याशी बोलाल तर तुम्हीही प्रेमात पडाल त्याच्या.

लता : रूपाचा चॉईस काय आलतू फालतू नसणार !

रूपा : प्रश्नच नाही. सगळ्या गोष्टीवर कमांड आहे त्याची आणि कविता तर काय करतो ! इंग्रजीमधून. आमच्या भेटी वाढल्या तर त्यानं एक सुंदर कविता मला गिफ्ट दिली.

बापू : व्वा. आहे का तुझ्याजवळ !

रूपा : जवळ ? मला पाठ आहे ती. चालीत म्हणते

If you call me, I will come
Swifter, O my Love,
Than a trembling forest deer
Or a panting dove,
Swifter than a snake that flies
To the charmer's thrall…
If you call me I will come
Fearless What befall.

If you call me I will come
Swifter than desire,
Swifter than the lightning's feet
Shod with plumes of fire.
Life's dark tide may roll between,
Or death's deep chasms divide—
If you call me I will come
Fearless what betide.

बापू : छान ! मस्तच आहे ग कविता. 'तू फक्त हाक मार, मी मनाच्या वेगापेक्षा अधिक गतीनं पोचेन'. खूप तरल शब्द आहेत.

लता : रूपा, तुला सोनं सापडलंय, जपून ठेव बाई !

रूपा : मॉम, मॅरेज ॲनिव्हर्सरीच्या सिल्व्हर ज्युबिलीला नवऱ्याला एकानं प्रश्न केला, तुमच्या सुखी जीवनाचं रहस्य काय, तर तो म्हणाला, 'माझ्या पात्रतेप्रमाणं बायको मला मिळालीय!' हे वाक्य मी कायम मनाशी ठेवलं !

लता : ओह ! ते तर खरंच, तू गुणवान नाहीस असं कोण म्हणतं ?

रूपा : थॅन्क्यू ! (बरोबर आणलेलं सामान गोळा करून स्वत:च्या रूमकडं जायला निघते.)

बापू : रूपा, अग एवढं काय काय सामान आणलंस ?

लता : आणि आज तू लवकर घरी परतलीयस.

रूपा : मी जाणार आहे. बॅप्स, अरे राघूचा बर्थ डे आहे. त्याला पार्टी द्यायचीय. त्याचं सामान आहे.

बापू : बर्थ डे पार्टी ! व्हेरी गुड, पण गिफ्ट काय देणार आहेस ?

रूपा : मी त्याला ब्रेसलेट घेतलंय. हो, पण त्यापेक्षा भारी गिफ्ट म्हणजे मी एक डान्स बसवलाय, खास त्याच्यासाठी.

लता : ती पार्टी इथे केलीस तरी वुई हॅव नो ऑब्जेक्शन !

रूपा : इथे ? शी: हॉटेलमध्ये देणार आहे मी. हां, माझ्या डान्सची झलक पाहायची तर दाखवेन तुम्हाला.

बापू : (उत्साहाने) येस, व्हाय नॉट.

रूपा : एक मिनिट ! (सी डी प्लेअरमध्ये सीडी लोड करते. एक इंग्रजी गाणं सुरू होतं. त्यावर ती नाचायला लागते. गाण्यानं हळूहळू वेग घेतलाय, नृत्य संथ गतीकडून द्रुतलयीत वळतं. इथं जोडीदाराची

गरज भासते ती धुंदीत तेव्हा बापू तिला जॉईन होतो. सुरूवात साधेपणानं होते, नंतर नृत्यातूनच जवळीक वाढते. नृत्याची लय वाढत जाते, तसा बापू तिच्या कमरेला हात लावतो. ती ताड्कन तो बाजूला सारते आणि ओरडते...) स्टॉप दॅट.

बापू : (दचकतो)काय झालं ?

रूपा : काय झालं म्हणून मला काय विचारतोस ? (लता दरम्यानच्या काळात सीडीप्लेअर ऑफ करते. रूपा संतापून आत जाते.)

बापू : खरंच काय झालं ते मला नाही कळलं?

लता : चांगली हसत खेळत नाचत होती. अचानक काय झालं पोरीला कुणास ठाऊक ?

बापू : तू काही ॲडव्हर्स रिमार्क दिलास का बघता बघता ?

लता : छे, मी कशाला काही रिमार्क देतेय. या तरूण मुलींचं असंच असतं. घटकेत एक मूड तर घटकेत दुसराच !

बापू : ते ठीक आहे, परंतु आताचं तिचं जाणं मला झिडकारणारं वाटलं. त्वेष होता तिच्यात.

लता : कदाचित राघूसाठी बसवलेल्या डान्समध्ये तू घुसलास हे आवडलं नसावं तिला.

बापू : अग पण पार्टनरची जिथं गरज आहे, नेमक्या त्या वेळेला मी तिला जॉईन झालो. नाही तर डान्स अर्धवट राहिला असता.

लता : आता तरी कुठं पूर्ण झाला म्हणायचा ?

बापू : शी : पोरीचा मूड गेला.

लता : काही नाही रे ! तू उगीच हळहळत बसू नकोस.

बापू : तिच्या स्पेशल माणसाचा वाढदिवस आहे, त्यासाठी तिची तयारी चालली आहे. हॅः ऽ ऽ

लता : डान्स मात्र झक्क बसवलाय तिनं, कुठं शिकून येते कुणास ठाऊक. आजकालच्या मुलींना काही शिकवावंही लागत नाही म्हणा.....

(रूपा आतमध्ये तणतणत आवराआवर करीत आहे. पार्टीसाठी जाण्याचा पोशाख तिनं घातला आहे. पार्टी मॅजिक पाईपशी ती काही झटापट करतीय. मध्येच काहीतरी आठवल्यानं तिनं पलंगावर किंवा टेबलावर चढून काठीनं काही काढायचा प्रयत्न केलाय. तिच्या

हातात मॅजिक पाईपही आहे. त्याच्याशी खटाटोप करताना तो हातात फुटतो आणि ती खाली पडते. त्या आवाजानं बापू लता दोघेही आत पळत जातात. रूपाला खाली कोसळल्यानं चांगलाच मुका मार लागलाय. बापू-लता तिला सावरतात.)

बापू : रूपा, एक मिनिट, हे बघ पाय सरळ कर.

लता : हो, एकदम अंग आखडू नकोस. थोडा ताण दे.

बापू : (तिला धरून शुश्रुषा करत) काही नाही, बरं वाटेल. (रूपा बापूला बाजूला करायचा प्रयत्न करतीय, पण बापूला तिचं शरीर दुखतंय असं वाटतंय. तो हलकेच दुखावलेल्या भागाला मालिश करतोय. तिच्या तोंडातून वेदनेनं शब्द फुटत नाही. रूपा कण्हतीय)

लता : थांब, मी पाणी देते तुला. (ती शेजारच्या टीपॉयवरचा पाण्याचा जग पाहते, तो रिकामा. ती पटकन स्वयंपाकघरात जाते. बापू रूपाला बरं वाटावं म्हणून हळूहळू तिचं अंग दाबतोय. रूपाला ते असह्य होतंय, त्यामुळं ती तळमळतेय. बापू तिच्या वेदना वाढल्या समजून तिच्यावर उपचार करतोय.)

रूपा : (हाताने इशारा करत) नको, नको.

बापू : काय नको. तू जरा शांत राहा. बरं वाटेल तुला. मी डॉक्टरांना फोन करतो.

रूपा : (कसं बसं) नको !

बापू : (फोनकडं चाललेला, परत तिला धरत) ओ.के. आधी तू शांत हो. मी नंतर फोन करतो. रिलॅक्स बेबी.
(पुन्हा तिला हळूवार मालिश करतोय)

रूपा : (निकराने) नको रे !
(लता पाण्याचा ग्लास घेऊन आलेली. ती रूपानं बापूला झिडकारलेलं पाहते. काहीशी चकित होते.)

लता : हं, रूपा हे पाणी पी थोडं. बरं वाटेल.
(रूपा तिच्या हातून पाणी पिते. इतक्यात रूपाचा मोबाईल वाजतो. बापू तत्परतेनं घेतो. त्यावरचं नाव वाचतो 'राघू')

रूपा : इकडं आणं !

बापू : (प्रेमानं तिला देत) घे.

रूपा : हॅलो, राघू. मी येऊ शकत नाही रे. मी पडलीय. मला बोलतानाही त्रास होतोय. आय एम सॉरी (बापू - लता तिचा विरस झाल्याचं पाहून खंतावतात) काय ? तू येतोयस? नको. पार्टीला सगळे जमले असतील ना ! त्यांना सोडून नको येऊस. राघू ऽऽ, मला तरी कुठं बरं वाटतंय. आय एम आल्सो फेडअप ! मला त्रास होतोय राघू. बट नो नीड टू कॅन्सल द पार्टी. बॉस येणार आहेत. इट विल बी हेल्पफूल फॉर अवर फ्युचर.(ऐकून) ओके. आय विल ट्राय. (फोन ठेवते)

लता : रूपा, तुला चालता येणार नाही. तू रेस्ट घे. (रूपा कण्हते.)

बापू : बेटा, काय होतंय - -

रूपा : (तो जवळ येतोय हे पाहून) तू माझ्या अंगाला हात लावू नकोस.

बापू : अग पण -

रूपा : डोण्ट टच मी.

(पुन्हा राघूचा फोन येतो. ती फोन घेण्यासाठी उठते. उभी राहून बोलायला लागते. पण तोल जाऊन कोसळते. बापू-लता तिला आवरतात आणि अंधार)

प्रवेश दुसरा समाप्त

प्रवेश तिसरा

(स्थळ तेच : मागच्या घटनेनंतर, काही दिवस उलटलेले. बापू बाहेरून येतो. अतिशय आनंदात)

बापू : लता, लता ऽ ऽ

लता : (बाहेर येत) अरे हो हो, किती मोठ्यानं हाका घालतोस ?

बापू : लता, गुड न्यूज आहे !

लता : वॉव, बोलिए जनाब !

बापू : आपल्या डी मॅट अकौंटला ४0 लाख रूपये जमा झालेयत.

लता : काय सांगतोस ?

बापू : येस. रिलायन्सच्या शेअर्सची कमाल आहे. एका रात्रीत सेन्सेक्स वाढला आणि आपला बॅलन्सही !

लता : क्या बात है ! ए ऽ पुढच्या महिन्यात दक्षिण भारतात जायचं का ट्रीपला ?

बापू : छान ! अकौंटवरून पैसे काढायच्या आत तुझे मनसुबे सुरू झाले का ?

लता : खूप दिवसापास्नं माझ्या मनात होतं साऊथ इंडियाची टूर करावी म्हणून.

बापू : यातली काही रक्कम पुन्हा दुसऱ्या कंपनीत गुंतवावी असा विचार आहे माझा.

लता : ते तू कर काय करायचं ते. पण माझ्यासाठी 'साऊथ' च्या टूरचा बंदोबस्त कर !

बापू : ते होईल ग !

लता : कन्याकुमारी, केरळ, उटी, म्हैसूर-बंगलोर अशी लांबलचक टूर काढायचीय मला.

बापू : मागच्यावेळी सगळा उत्तर भारत पालथा घातला ना आपण. माझं टूरचं प्लानिंग किती परफेक्ट असतं हे तुला माहितीय.

लता : तेच आता 'साऊथ' साठी कर.

बापू : हो. आधी आपल्याला या रकमेची सिक्युअर्ड इन्व्हेस्टमेंट करायची आहे.

लता : बापू, तू आणखी पैशाच्या मागं लागू नको. माझे पी एफचे पैसे, तुझेही पी एफ, ग्रॅच्युइटीचे पैसे दुप्पट झाले आहेत. त्यात हा

शेअरचा फायदा ! आपण दोघेही ऑलरेडी कोट्यधीश आहोत, आयुष्यभर कष्ट केले, आता मस्त मजा करू या ना !

बापू : व्हाय नॉट ! तू लाग तयारीला.

(रूपा फोनवर बोलत येते. बहुधा राघूशीच)

रूपा : (फोनवर) तू असं कसं म्हणतोस? हाऊ इज इट पॉसिबल? मला एकेक क्षण नकोसा वाटतोय वूई मस्ट टेक सम डिसिजन ऑन धिस मॅटर. (दोघांकडं कटाक्ष टाकून स्वत:च्या रूममध्ये जाते) ओ के फाईन. मी फायनल करून टाकते सगळं, रादर आधीच डिसिजन घेतलाय. राईट, आय विल रिंग यू आफ्टर सम टाइम. (फोन ठेवते तिनं बॅग वगैरे आवरून ठेवलीय, बाहेर येत) फाईन, तुम्ही दोघंही इथं आहात ते बरं झालं !

लता : आम्ही कुठं जाणार ? दोघंच ?

रूपा : (गांभिर्याने) मला तुम्हाला काही सांगायचंय !

बापू : ते सांग सावकाशीनं. आधी माझं ऐक - -

रूपा : बॅप्स ऽ ऽ

बापू : रूपा, रूपा ऽऽ (तिला धरून फिरवतो) अग, सेन्सेक्स वाढल्यामुळं काल माझ्या अकौंटवर ४0 लाख जमा झाले. आहे की नाही गुड न्यूज !! (तो तिला फिरवतोय)

रूपा : (त्याला झिडकारत) सोड, सोड मला.

लता : (अवाक्) रूपा ? काय झालं

रूपा : काय झालं म्हणून काय विचारतेस ? हा सारखा माझ्या अंगचटीला येतो. मला नाही आवडत ते!

बापू : रूपा, काय बोलतेस तू हे ?

रूपा : उबग आलाय मला त्याचा. साध्या साध्या गोटी सांगताना, बोलताना सतत मला स्पर्श करण्याचा प्रयत्न करतोस. डिस्गस्टिंग !

लता : काहीही बोलू नकोस रूपा, आधी माफी माग त्याची.

रूपा : माफी ? माय फूट ! आजवर सहन केलं खूप. सुरवातीला दुर्लक्ष केलं मी. नंतर जसं लक्षात आलं तसं नोट केलं एकदा, दोनदा, तीनदा ! सारखा माझ्या अंगाला हात लावतो.

लता : अग तुझं वय काय, बापूचं काय - -

रूपा : तेच म्हणतीय मी. माझं वय काय, त्याचं काय ? पण नाही त्याचीही तमा नाहीये त्याला.

बापू : रूपा, मला समजतच नाहीये तुझं बोलणं !

रूपा : मखलाशी करतोस ? आता अकांडतांडव करशील, माझा हेतू तसा नाही वगैरे बरळशील. मला ते ऐकायचं नाहीये.

लता : रूपा, डोकं फिरलंय का तुझं ?

रूपा : माझं नाही, या बापूचं फिरलंय. त्याच्या या किळसवाण्या प्रकारामुळं मी जाणीवपूर्वक अंतर राखलं. कधी तुमच्या जवळ आले नाही. माझ्या पर्सनल गोष्टी उगाळत नाही बसले. साध्या गोष्टींचा आनंद कधी घेऊ दिला नाही मला. मी डान्स करायला लागले तर आला हा ही. मी पडले, एवढं मला लागलं, तर यानं माझ्या सगळ्या अवयवांना चाचपून बघितलं. शी : आठवलं तरी हजार झुरळं अंगावर एकदम चढल्यासारखी वाटतात. मी पेईंग गेस्ट असले तरी आश्रित नाही तुमची.

बापू : (पॉज, धक्का बसलाय) आय कान्ट बेअर धिस ! रूपा, पेईंग गेस्ट नाही, मुलगी समजतोय मी तुला माझी.

रूपा : बस कर आता हे मुलामे देण्याचं नाटक.

लता : नाटक कसलं रूपा ? तुझं डोकं ठिकाणावर आहे का ? तुला पेईंग गेस्टसारखं आणि आश्रितासारखं तरी कधी वागवलं गं आम्ही ? सतत तुझी चिंता, काळजी वाहिली आम्ही !

रूपा : बेगडीपणा आहे हा. महिन्याच्या महिन्याला ठरलेले पैसे देत होते ना मी ? मग फक्त त्याची चिंता करायची. माझी काळजी घ्यायला मी समर्थ आहे.

बापू : कधी तुझ्याकडं पैशाची मागणी तरी केली का आम्ही ?

लता : बापाविना वाढलेली पोर म्हणून किती माया करतोय तुझ्यावर !

रूपा : माया ? हरेक घडीला माझ्या शरीराला स्पर्श, काही बोलायचं तर अंगाला हात लावून ? ही बापाची माया ?

लता : पुरूषाचा स्पर्श केवळ एकाच भावनेनं होत नसतो - -

रूपा : पुरे झालं. मी तुला आईसारखी समजून मॉम म्हणत होते. तुझ्यात मला माझी आई दिसते. माझ्या खऱ्या बापाला तर मी

पाहिलंच नाही. म्हटलं, हे चांगलं घर मिळालं आपल्याला. माझ्या आईचीही काळजी संपली; इथं तुमच्याकडं मी राहतीय म्हटल्यावर ! वेळोवेळी मी पॉईन्ट आऊट करत होते बॅप्सचा टच !

बापू : रूपा, मुली तू काहीतरी गैरसमज करून घेतेयस.

रूपा : तो गैरसमज असावा असं मी मनाशी म्हणत होते. तसं असतं तर किती बरं झालं असतं. घरीदारी सगळीकडं तोच अनुभव. रस्त्यानं फिरताना, बागेत, बसमध्ये..... जिथं जिथं म्हणून माणसाची वर्दळ असते, तिथं सर्वत्र हा स्पर्श दबा धरून जणू माझ्या येण्याची वाट पाहायचा. बाहेरचे धक्के मी पचवले, परंतु घरातला हा अनुभव मला पेलणं शक्य नाही.

लता : रूपा, आमचं सहजीवन आता पंचवीस वर्षाचं आहे. बापूच्या प्रत्येक हालचालीतला अर्थ मी जाणून घेतलाय. निदान बापूवर तरी तू असा आरोप करायला नको होता.

रूपा : (ओरडते) आरोप नाहीये हा ! ही वस्तुस्थिती आहे. (संतुलित पण कबेर आवाजात) वयानं लहान असले तरी मोठेपणाचे अनेक अनुभव मी घेतले आहे. आमच्या गावाकडच्या घरात, माझ्या मित्र-मैत्रिणींबरोबर खेळताना होणारे स्पर्श, कॉलेजात शिकताना वहया-पुस्तकांची देवाण घेवाण करताना केले जाणारे जाणीवपूर्वक स्पर्श, रस्त्यानं जाताना गर्दीत अभावितपणे झाल्याचं दाखवत मुद्दाम केला जाणारा चिकटूपणा, यातला फरक मला चांगला कळतो. अगदी आमच्या शेजारच्या काकांनी स्तोत्रं म्हणताना शाबासकी म्हणून केलेला आणि बऱ्याचदा शिक्षा म्हणून केलेल्या स्पर्शातली रखरखीत जाणीव मी मनाशी बाळगून आहे. राघू माझा प्रियकर, पण त्यालाही मी विशिष्ट अंतरावर रोखून धरलंय. या सगळ्या स्पर्शकल्लोळात मला आश्वासन फक्त त्याचं आहे. आणि तरीही मी त्याला नाही बिलगू शकत. माझ्या रंध्रारंध्रात 'आपल्या-परक्या' स्पर्शाची विलक्षण सरमिसळ झालीय. माझी त्वचा मलाच कधी कधी छिलून काढावीशी वाटते. कधी कधी माझं स्त्रीत्व माझ्या सगळ्या जाणिवांवर पांघरूणासारखं आच्छादन घालतं. 'हे मी सहनच करायचं','हे मी भोगलंच पाहिजे',अशा दुर्गंधीयुक्त फुंकरीनं स्वत:ला समजावत राहायचं? नाही, मला हे मान्य. बऱ्याचदा

मलाच माझा स्पर्श अनोळखी होऊन जातो. काय हे बापुड वाणं तरीही भणभण करणारं दु:ख माझ्या कातडीशी झोंबतंय. माझ्या एकाकीपणाचे, एकटेपणाचे असहय हुंकार या झोंबऱ्या आणि सलणाऱ्या जाणिवांनी, का मी साहत राहायचे. हे सगळं मला असहय होतंय. तुम्ही मला प्रेम दिलंही असेल, परंतु त्यातील शुध्दाशुध्दता तपासण्याचं भान माझ्या सालटीच्या आत घुसू नाही शकलं. नको मला हा सहनशीलतेचा त्रास. मी हे घर सोडतीय. मॉम, मी तुला त्रास दिला असेल तर माफ कर मला. टॅक्सी घेऊन येतेय मी. (बापूकडं न पाहता निघून जाते. बापू हे सगळं ऐकत 'कोलॅप्स' होण्याच्या स्थितीत)

लता : बापू ऽ ऽ (ती बापूच्या पाठीवर ठेवते, बापू तिच्या कमरेला मिठी मारून ढसढसा रडतोय.)

बापू : लता, काय झालं हे ?

लता : (डोळयातलं पाणी आवरून कणखरपणे) बापू, तुझा काहीही दोष नाही, मला चांगलं ठाऊक आहे ते.

बापू : प्रत्यक्ष बायकोसमोर माझ्यावर लंपटपणाचा आरोप केला रूपानं.

लता : शरम वाटावी असं काहीही केलेलं नाहीस तू.

बापू : हे तू म्हणतेस. त्या कालच्या पोरीनं मला असं सुनवावं ?

लता : असली अपत्यं होण्यापेक्षा आपण निपुत्रिक आहोत तेच बरं वाटतं मला.

बापू : (पॉज) रूपाला मी स्वत:ची मुलगी समजून वागत होतो. आपल्याला न होणाऱ्या अपत्यसंभवाचं दु:ख तिच्या सहवासात मी विसरत होतो.

लता : मला चांगलं माहिती आहे ते. म्हणूनच तुझ्या बरोबरीनं तिच्या संगोपनात मी सहभागी होत होते. काही काही लपवून ठेवलं नाही तिच्यापासून. आपल्या बँक बॅलन्सपासून नातेवाईकांच्या अभावापर्यंत सगळं तिला वेळोवेळी सांगितलं.

बापू : रूपामुळं या घराला घरपण आलं होतं. तिच्यामुळं माझ्यात चैतन्य निर्माण झालं होतं.

लता : बापू, मी असतानाही तू 'रूपा-रूपा' करत होतास, त्यातला तुझा

भाव मला कळला नाही, असं समजू नकोस. मी तुला मूल नाही देऊ शकले पण दैवयोगानं ही पोर चालत आपल्या घरी आली, त्यातलं सौहार्द मी खरं मानलं. आपली स्वत:ची पोर असल्यागत तू वागत होतास तिच्याशी-त्या सलगीत माया दाटलेली होती हे माझ्याशिवाय अन्य कुणाला कसं कळणार ?

बापू : आणखी काहीही म्हटलं असतं तिनं, चार शिव्या घातल्या असत्या तरी मी सहन केलं असतं..

लता : फख आतून किडकं आहे हे समजायला वेळ जातोच.

बापू : नाही लता,असं कसं म्हणतेस? या मोठया शहरात स्वत:च्या बळावर ती एकटी उभी राहिली. तिची हुशारी, बुध्दिमत्ता या सगळया गोष्टी नाकारता कशा येतील ?

लता : आपल्या-परक्यातला भेद कळत नाही ती हुशारी काय कामाची ?

बापू : (मनाशी काही ठरवून) लता, माझ्या मनात पाप नव्हतं आणि नाही हे तुला माहिती आणि मलाही ! तरीही रूपाला असं वाटावं यात तिच्या मनाचा खेळच कारणीभूत आहे.

लता : म्हणजे ? काय म्हणायचंय तुला ?

बापू : निकोप मनानं आपण तिच्याशी वागत होतो, कोणताही आडपडदा न ठेवता. तिनं मात्र त्याचा वेगळाच अर्थ काढला. याचा अर्थ तिच्या मनावर पुरूषांच्या वागण्याचा विपरित परिणाम झाला आहे.

लता : घरदार सोडून बाहेर शिकायला राहायचं तर कडू गोड अनुभव येणारच.

बापू : एक्झॅक्टली. रूपाच्या मनावर त्याचाच परिणाम स्पष्ट दिसतोय. मला वाटतं, ही तिला सावरण्याची वेळ आहे.

लता : इतकं तिनं बोलूनही तू असा विचार करू शकतोसच कसा ?

बापू : ती काळाची गरज आहे. रूपाच्या बोलण्यानं, आरोप करण्यानं मी हादरून गेलो पुरता. पण तिच्या बोलण्यामागचा कंद तिच्या अनुभवातून पिकला आहे.

लता : बापू, तुझी विचार करण्याची पध्दतच समजली नाही मला. मुलाचा चान्स घेतला तर माझ्या जीवाला धोका आहे, असं डॉक्टरांनी सांगितलं तर तू स्वत:ची नसबंदी करून घेतलीस.

बापू : या आपल्या पर्सनल गोष्टी आहेत लता. मी काही फार मोठा त्याग केला वगैरे सांगून तू मला 'त्यागमूर्ती' बनवू नकोस.

लता : माझ्यामुळं तुला बाप बनता आलं नाही. ती तुझी भूक रूपाच्या सहवासातून भागत होती, तर त्या पोरीचं डोकंच विपरित !

बापू : नाही लता, आपण तिला समजून घेतलं पाहिजे. ती मघाशी जे बोलली ते उथळ नव्हतं. तिच्या वयाच्या मुलींनी बोलावं इतकं पातळ नव्हतं. त्या बोलण्यात दु:खाच्या छटा होत्या. सहन केल्याच्या खुणा होत्या. मला वाटतं, आता तिला बापाची गरज आहे, आईची गरज आहे.

लता : मग काय करायचं ठरवलं आहेस तू ? अरे, अशा बिनदिक्कत आरोप करणाऱ्या पोरी कोणत्याही थराला जाऊ शकतात. आज नुसतं तोंडावर बोलून ती गेली. उद्या पोलिसात तक्रार देऊन नाचक्की करायला कमी करणार नाही ती.

बापू : लता, रूपा तशी नाही. आजवरच्या सगळ्या साचलेपणाचा स्फोट केला तिनं. रूपाला सांभाळायला हवं. आपण तिला थांबवू या.

लता : (चिडते) कसं थांबवतोस ? हो, माझ्याकडून चूक झाली म्हणून नाक रगडतोस का तिच्यासमोर.

बापू : असं करायची गरज नाही.

लता : मग थांबवणार कसा तिला ? तुझ्या निष्कपट वागण्याचा, तुझ्या पितृतुल्य स्पर्शाचा वेगळाच अर्थ लावलाय तिनं. जितक्या लवकर ती इथून जाईल तितकं बरं !

बापू : दुसरं कुणी असतं तर मी तुझं म्हणणं मान्य केलं असतं. रूपा अजाण आहे. जगाचा एकतर्फी अनुभव तिनं घेतलाय. चांगली माणसंही इथं आहेत याची जाणीव तिला व्हायला हवी.

लता : चुकीचं बोलतोयस तू. तिच्या भोवतालच्या जगानं तिला कडवटपणाच दिलाय. लहानपणापासून प्रेमाची वासनेच्या रूपातून भेट झालीय तिची. त्यामुळं मोठ्या माणसांचा मानमरातब, त्यांचा आदर-सन्मान काही माहिती नाही तिला. मतलबी झालीय ती.

बापू : सावरण्याची हीच वेळ आहे. चांगुलपणाचा प्रत्यय तिला देण्याची आपण तयारी ठेवली आहे.

लता : बापू, लोककथेतल्या गोष्टीत लहानपणापासून विषाचा कण कण

पचवणारी विषकन्या जशी असते, तशी ही रूपा आहे.
पुरूषाबद्दल तिच्या मनातलं रूपक वेगळंच आहे.

बापू : अजिबात नाही. तू उगाच मोठमोठया गोष्टी सांगू नकोस. काही होणार नाही तसं.

लता : काहीही झालं. तरी मी तुझ्याबरोबर आहे. तुझ्यावर एवढा आघात करूनही तू तिला पुन्हा सामावू पाहतोस. आय एम विथ यू !

बापू : हा काही लढा नाही लता. सगळया जगावरचा विश्वास उडून गेला तर तिच्या वाट्याला कसलं जगणं येईल कल्पनाच करवत नाही.
(इतक्यात रूपा टॅक्सी घेऊन येते. दोघांकडं न पाहता ती तिच्या रूमकडं जाते. तिचा मोबाईल वाजतो. फोनवर राघू .....)

रूपा : हां राघू बोल. हं, मी निघतीय. टॅक्सी आणलीय. (बाहेर बापू आणि लता बोलतायत)

बापू : टॅक्सी परत पाठवून द्यायला हवी.
(आत रूपा आणि बाहेर बापू अनुक्रमे राघू व लताशी बोलतायत)

रूपा : फोनवर राघूला आता फेरविचार नाही, मी निर्णय घेतलाय.

बापू : तिला निर्णय बदलायला लावू.

रूपा : हो, तीन वर्ष काढली मी इथं. त्या तीन वर्षात वेळोवेळी जे झालं, त्याचा आता कडेलोट होतोय.

बापू : इथून बाहेरच्या जगात जाणं म्हणजे कडेलोट ठरेल तिचा.

रूपा : (फोनवर) नाही. कुठंही जागा घेतली नाही. कंपनीच्या रेस्ट हाऊसवर जातीय आता.

बापू : अचानक चाललीय. कुठं जाऊन उतरेल. ती माणसं कशी असतील?

रूपा : (फोनवर) आठवडाभरात दुसरी जागा मिळेल. तेवढयापुरतं रेस्टहाऊस चालेल. आणि तू काय नुसता फोनवरच बोलणार आहेस का ? भेटणार नाहीस ?

बापू : राघूला तरी निदान समजावून सांगायला पाहिजे. त्या दोघांची भेट होईलच की.

रूपा : फोनवर तू मला हेच समजावणार असशील तर भेटूच नकोस. निदान दुसरी जागा मिळेपर्यंत तरी.

लता : (बापूला) ती नाही रे ऐकणार कुणाचंही. हेकट आहे पोरगी.

रूपा : (फोनवर) हेकटपणा मी नाही, तू करतोयस राघू. मी माझ्यावर गुदरलेल्या प्रसंगाचं एवढं तुला सांगतीय आणि तू तिथंच राहायला फोर्स करतोयस.

लता : (बापूला) तू तिला फोर्स करू नकोस.

रूपा : माणसांच्या चांगुलपणाचा हवाला तू असा फोनवरून; उंटावरून शेळया हाकल्यासारखा देऊ नकोस.

बापू : वरवरच्या गोष्टीवरून अंदाज बांधण्यात मुर्खपणाच होतो बऱ्याचदा.

रूपा : फोनवर उसळून मुर्खपणा काय यात ? तुझ्याशी इतका वेळ बोलतीय तोच मुर्खपणा ठरलाय माझा. तू कधी येतोयस ते सांग. जमलं तर ये, नाही तर ऑफिसात भेटू. बाय.(फोन ठेवते. बॅग घेऊन बाहेर येते.)

रूपा : (लताला) ओ के गुडबाय.
(लता काही बोलणार तोच बापू पुढे होतो)

बापू : रूपा, पोरी माझं ऐक.

रूपा : (त्याच्याकडं न बघता) काही ऐकायचं नाही मला.

बापू : तू आता रागात आहेस आणि रागारागानं कोणताही निर्णय घेऊ नये. पश्चातापाची पाळी येते.

रूपा : पश्चाताप आताच होतोय मला.

बापू : हे बघ रूपा. माझ्याकडून काही चूक झाली असेल अनवधानाने तर माफ कर मला. तुझं असं तडकाफडकी सोडून जाणं मला पसंत नाही. मी आणि लतानं तुझ्यावर आई-बापासारखं प्रेम केलं. आम्हाला मुलबाळ नाही म्हणून कधी खंतावलो नाहीत आम्ही तू इथं आल्यापासून. तुझ्यात मी माझी मुलगी पाहत होतो. तुझा डॅशिंगपणा, धाडस, फटाक्कन निर्णय घेण्याची तुझी स्टाईल, सगळं मला आवडत होतं, आवडतं. बाहेरच्या जगात किंवा ऑफिसात चुकीचे असले तरी ते तुझे निर्णय होते. पण इथला तुझा निर्णय चुकतोय. यापुढं मी तुला आवडेल असंच वागेन. तू नकोस जाऊ इथून. अगं, आमच्याकडं सगळं आहे. या घरात कशाचीही कमतरता नाही. पैसा, दौलत सगळं आहे. पण इवली इवली अडखळती

पावलं या घरात धावली नाहीत. तुझ्यामुळं आम्ही तो अनुभव घेत होती. रूपा, एरवी 'पेईंग गेस्ट' ठेवून पैसे कमवावेत अशी आमची कधीच इच्छा नव्हती. तुझ्यासारखी उमदी पोर इथं राहिली तर तेवढाच जीवाला दिलासा !

(रूपा हे सगळं निलाजऱ्या कडवेपणानं ऐकतीय. लता बापूच्या विनवणीनं स्तंभित झालेली.)

रूपा : तुझं बोलणं झालं असेल तर मी पळते. आणि झालं नसलं तरी मला त्याच्याशी आता देणंघेणं नाही बाय.

(रूपा निघून जाते. ती गेल्याच्या दिशेला बघत बापू फुटतो.
लता त्याला सावरते आणि इथंच पडदा)

- अंक पहिला समाप्त -

अंक दुसरा

प्रवेश चौथा

(स्थळ तेच. रूपा निघून गेल्याने बापूला धक्का बसलाय. तो डिप्रेसड् आणि नर्व्हस मूडमध्ये आहे. लता त्याला सांभाळून घेते आहे. रूपाच्या रूममध्ये बापू आवराआवर-साफसफाई करतोय.)

बापू : सगळं नीट आवरायला पाहिजे. पोरीला वेळ मिळत नव्हता.

लता : बापू, बापू ऽ कुठं आहेस ? ती ही रूपाच्या रूममध्ये येत. अरे, काय करतोयस ?

बापू : अग आवरून नको का ठेवायला सगळं. पसारा कितीय ?

लता : कुठं पसारा आहे ? चल तू बाहेर .

बापू : थांब मला व्यवस्थित ठेवू दे सगळं. (तो खोली पुन्हा लावायला लागतो.)

लता : असं काय करतो बापू, काल तूच तर आवरली होतीस ना रूम !

बापू : रूपाची खोली म्हण. ही 'रूपाची खोली' आहे. तुला आठवतंय, लग्न झालं तेव्हा आपण गावाकडं पहिल्यांदा गेलो होतो. तिथं होतं प्रत्येक खोलीवर लिहिलेलं.....

लता : हो. देवाची खोली - -

बापू : देवाची खोली नव्हती, देवघर म्हण. हॅ: म्हणजे तुला काहीच आठवत नाहीये. उगीच हो हो म्हणतीयस.

लता : नाही रे आठवतंय ना. दादांची खोली, अप्पुघर आणि ती कोठीची खोली. कोठीची खोली म्हणजे काय, असं मी विचारलं होतं तुला ?

बापू : हं, आत्ता आठवतंय तुला. कोठीची खोली म्हणजे अन्न धान्याची खोली. सगळं तिथं साठवून ठेवलेलं असायचं.

लता : आणि अप्पांनी स्वत:च्या खोलीला 'अप्पूघर' असं नावं दिलं होतं.

बापू : तशी ही रूपाची खोली.

लता : (विषय बदलत) तुला ती गावाकडची तानूताई आणि पखालबुवा आठवतो का रे ?

बापू : तानूताई ? हां. तिला अटक केली होती.

लता : बघ ना. तीन-चार महिन्याच्या नातवाशी झेलाझेली खेळायला लागली.

बापू : घरात नवं कुणी येणं हा आनंदाचाच भाग असतो. त्यामुळं तर जगण्यात उत्साह येतो.

लता : बिचारी तानूताई. आनंदसुध्दा पचवता आला पाहिजे.

बापू : तिनं बाळाला असं उंच फेकत झेलायला सुरूवात केली आणि तिसऱ्या की चौथ्या वेळेस त्याला झेलायचंच विसरली.....

लता : आई ग ऽ नको सांगू नकोस पुढचं !

बापू : तानूताईची आठवण तूच काढलीस.

लता : काढली, पण तिच्या घोड्यावरून रपेटीच्या सवयीबद्दल बोलशील असं वाटलं.

बापू : नातवाशी झेलाझेली केल्याचं तूच म्हणालीस.

लता : तानूशी आता तीच आठवण निगडीत आहे. पण एखाद्या तगड्या जवानाला लाजवेल अशी घोडेस्वारी ती करायची.

बापू : चार वर्षानंतर तुरूंगातून सोडलं तिला. आणि पुढच्याच वर्षी वारली ती.

लता : अगदी वेगळीच होती ना रे ती. तिचा आनंद, उत्साह कुणाला समजूनच घेता आला नाही.

बापू : माझंही तसंच झालंय असं म्हणायचंय का तुला ?

लता : तुझं ? तुझं कुठं काय ?

बापू : लता, तुला मी काय कमी त्रास दिलाय का ?

लता : (विषयाला बगल देत) चल काहीतरीच.

बापू : लता, तानूताईच्या आठवणीनं तू कसनुशी होतेस. बाळाला पकडलंच नाही. रक्ताची बाटली फरशीवर आपटून फुटावी, तसं झालं सगळं. आणि मी ...

लता : तुझा काय संबंध आहे त्यात? तानूताईचं अवधान सुटलं होतं. आनंदाच्या गर्तेत सापडल्यासारखं झालं होतं तिला.

बापू : मीही तसाच भिरभिरलो होतो. लता, मला ठाऊक आहे. तुझ्या वांझपणाला मी कारणीभूत आहे.

लता : (कानावर हात ठेवते) काहीतरी बोलू नकोस. वांझपणा काय? कसला अभद्र शब्द वापरलास !

बापू : तुझ्यासाठी नाही. माझ्या मुर्खपणाला लागलेलं ते दु:खाचं अस्तर आहे.

लता : का स्वत:ला कोसतोस ? जे झालं तो एक अपघात होता.

बापू : मी त्याला कारणीभूत होतो. कशाला मी तुला स्कूटरवरून नेलं आणि कशाला तो अपघात झाला !

लता : तो खड्डा तुला दिसला नाही.

बापू : तू तीन-चार महिन्यांची गर्भवती होतीस याचं तरी भान ठेवायला होतं. तुला मी...

लता : तू छान सांभाळतच होतास मला. आपण तेव्हा डॉक्टरकडंच निघालो होतो.

बापू : तुझ्या पोटातल्या बाळाची काळजी घेण्यासाठी निघालो आणि काळजीचं कारण कायमचं नाहीसं झालं !

लता : माझ्या जीवावर बेतलेला तो अपघात तुझ्या शुश्रुषेमुळे सुसह्य झाला. किती सांभाळलंस मला.

बापू : पण त्यामुळं तुझं मातृत्व हिरावलं ना मी.

लता : तू त्याला जबाबदार नाहीस बापू. पुन्हा चान्स घेतला तर माझ्या जीवाला धोका आहे, असं म्हणाले डॉक्टर म्हणून आपण त्याच्या वाटेला गेलो नाही.

बापू : आणि वांझपणाचा शिक्का तुझ्या कपाळावर उमटला.

लता : सगळया गोष्टी झाल्या आता. तू उगाच जुन्या खपल्या उकरू नकोस.

बापू : माझ्या चुकीमुळं तुझी किती हानी झाली. त्याची भरपाई कशी करू सांग !

लता : आजवर किती मायेनं सांभाळलंस मला. कशाची ददात नव्हती मला; आणि नाही !

बापू : एखादी मुलगी असावी असं कितीदा तू बोलून दाखवलंस. खूपदा तर मध्यरात्री झोपेतही तू बरळायचीस. मीच तर जागं केलं तुला अनेकदा !

लता : बापू, 'पेईंग गेस्ट' म्हणून एखादी मुलगी घरी सांभाळण्याची कल्पना त्यातूनच निघाली ना ?

बापू : हो. तेवढयासाठी रूपाला आपण जीवापाड सांभाळत होतो. तिला हवं नको पाहात होतो.

लता : अगदी आपल्या मुलीसारखं तू वागवलंस तिला.

बापू : नाही कळलं तिला ते ! माझ्या मनात खोट नव्हती ग !

लता : बापू, तुझ्या प्रत्येक हालचाली मला ठाऊक आहेत. तू पवित्र आहेस. तुझ्या स्पर्शातली आश्वासकता मी हरघडी अनुभवली आहे. अपघातानंतर मला दवाखान्यात राहावं लागलं तेव्हा तू ज्या मायेनं मला हवं नको पाहात होतास, त्या तुझ्या कृतीतला सच्चेपणा मला बळ देत होता. आपण कुणाला तरी हवे हवेसे वाटतो या जाणिवेनं जगणं सुसहय होतं. तेव्हाच्या तुझ्या स्पर्शातील व्याकुळता, आश्वासन, धीर हे सगळं माझ्या मनात आजही ताजं आहे. भलेही २५ वर्षे उलटून गेली असतील त्याला.

बापू : रूपा तशीच गेली असती तर चाललं असतं एक वेळ - -

लता : बापू, रूपाला तू किती तऱ्हांनी जपत होतास. तिच्या आईला त्याची खात्री होती म्हणूनच तिनं आपल्याकडं राहायला परवानगी दिली ना.

बापू : आयुष्यानं प्रत्येक आनंदाच्या उत्कटक्षणी मला हरवलं आहे, पराभूत केलं आहे लता ! तू आई होणार असल्याचा आनंद माझ्याकडून कायमचा हिरावला गेला. आणि ते मातृत्वाचं सुख रूपाच्या निमित्तानं लाभावं म्हणून किती प्रयत्न करत होतो. नाही शक्य झालं ते. आज पैसा आहे, सगळया सुखसोयी आहेत. भरभरून मिळालंय सगळं. या पोरीनं माझ्या वात्सल्याची आर्तता जाणली नाही. किती स्वच्छंदी होती ती.

लता : बापू, तुला जसं मी जाणते तशी परिस्थितीही पाहतीय मी. ही तरूण पोरं-पोरी दुसऱ्यावर विश्वास ठेवायला तयार नसतात. कुणीतरी आपल्याला फसवेल ही भीती कायम त्यांच्या मनात घर करून असते. त्याच्यातून त्यांचा स्वत:वरचाही विश्वास उडतो. आपल्या जीवाभावाच्या माणसांनाही जुमानत नाहीत ती. त्यातून रूपासारख्या मुलीनं बापाचा स्पर्शही कधी अनुभवलेला नाही.

बापू : लता...

लता : थांब बापू. झालं गेलं विसरून जा असं मी म्हणणार नाही, पण

बापू : रूपाला मी विसरणंच शक्य नाही लता. तिच्या आठवणी माझ्या दिवसाच्या हरेक प्रहरांशी निगडीत आहेत. सकाळी उठल्यापासून दिवसाच्या अखेरपर्यंत रूपाशी मी बांधलो गेलो होतो.

लता : माझ्याशिवाय ते कुणाला माहिती असणार ? आता आलेली परिस्थिती नाकारता तर येणार नाही...-

बापू : रूपाच्या आठवणीत या खोलीतला तिचा वावर, मोबाईल फोन कानाला लावून घरभर फिरण्याची तिची स्टाईल, बॅप्स ऽ ऽ म्हणून हाक मारण्याची तिची पध्दत. थकून गेली दिवसभराच्या भिरभिरीनं की या इथं कोचात शांत पडून राहायची. रूपा म्हणजे चैतन्य, रूपा म्हणजे सळसळता उत्साह ! या घराचा प्राण ! ती आली की घर उजळून जायचं. तिच्या ऑर्डर्स 'चहा कर,' 'ब्रेकफास्टला पावभाजी कर' 'मोबाईलचा सेट बदलून घे,' 'बिथोवनच्या सिंफनीज् लावं' एक ना दोन ! रूपानं माझं म्हणून काही ठेवलं नव्हतं आणि तिचं स्वत:चं म्हणून काही राखलं नव्हतं. आपल्या घराचं अस्तित्व होतं रूपा म्हणजे !

लता : ओ. के. बापू, तू किती वेळ तेच तेच उगाळत बसणार आहेस. मला वाटतं, आपण आणखी कुणाला ठेवू या 'पेईंग गेस्ट' म्हणून.

बापू : (खवळतो) बकवास करू नकोस.

लता : बकवास काय त्याच्यात. मान्य आहे तू थोडा गुंतला होतास रूपामध्ये. गेली ती. म्हणून पुन्हा दुसऱ्या कुणाला 'पेईंग गेस्ट' ठेवायचंच नाही असं नाही ना ?

बापू : (संतप्त) यू फूल. रूपाची जागा कोणीही घेऊ शकणारं नाही.

लता : एक्झॅक्टली. रूपाचं आपल्या मनात असलेलं स्थान अबाधित राहील. त्याला धक्का द्यायचा नाही.

बापू : तो कोणी देऊही शकणार नाही.

लता : करेक्ट. मग पुन्हा ॲड देते पेपरात. कुणीही चांगली मुलगी घेऊ आपण.

बापू : मुळीच नाही. रूपाच्या खोलीत कुणी दुसरी जाणार नाही. मला खपणार नाही ते. ही रूपाची खोली आहे आणि तिचीच राहणार.

लता : लहान मुलासारखा हट्ट करतोयस तू.

बापू : हट्ट काय त्यात ?

लता : हट्टच ! रूपा गेल्यापासून तू तिच्याशिवाय दुसऱ्या विषयावर बोललास का माझ्याशी ? मान्य आहे तू तिला मुलीसारखं ट्रीट करत होतास. म्हणून काय कायम तिलाच कवटाळून बसणार आहेस का ?

बापू : तुला कळत कसं नाही. का अकलेचा भुगा झालाय तुझ्या ?

लता : हे बघ बापू, रूपावरून तू माझ्याशीही अरेरावी करायला लागलास !

बापू : अरेरावी ? मी काय केलं तुला ?

लता : मी काही सांगतीय तुला त्याला काही किंमत आहे की नाही ?

बापू : असं कसं म्हणतेस ? तुझ्यासाठी तर केलं ना सगळं !

लता : मग मी सांगते तसं कर आता !

बापू : काय ?

लता : आपण पुन्हा जाहिरात देऊ. आपल्याला चांगली वाटेल अशी कुणीही मुलगी 'पेईंग गेस्ट' म्हणून सांभाळू !

बापू : शक्य नाही ते. लता, तू मला तेच तेच पुन्हा पुन्हा सांगू नकोस. उद्या एखादी मुलगी दत्तक घेऊ. तिला वाढवू असंही म्हणशील. या सगळ्या पर्यायांवर आपण विचार केलेला आहे. त्यातूनच 'पेईंग गेस्ट' ची आयडिया निघाली. रूपा त्यातूनच भेटली ना ?

लता : तोच पर्याय पुन्हा करायचा ! कुठली तरी मुलगी आपली म्हणून दत्तक घ्यायची आणि तिच्याशी आपलं पटेनासं झालं की सगळंच कठीण होणार, त्यापेक्षा 'पेईंग गेस्ट' बरी !

बापू : मला रूपाच्या ठिकाणी दुसरं कुणाला बघवत नाही.

लता : अरे अलिप्त राहायचं. तिच्या तिच्या वेळा, तिची नोकरी ती सांभाळेल. आपण आपल्या कामात राहायचं

बापू : असलं दुभंगलेपण मला मान्य नाही. तू नव्या 'पेईंग गेस्ट'चा विचार सोडून दे !

लता : मग तू रूपाचा विचार करणं सोडून दे !

बापू : शक्य नाही ते.

लता : मला हे असहय होतंय.

बापू : आय एम हेल्पलेस !

लता : अरे पण - -

बापू : रूपाची आठवण होतेय

If You Call me, If You Call me
I will Come,
Swifter, O My Love
If you Call me I will come
Swifter than desire

लता : बापू ऽ ऽ

बापू : (रिमोटनं टीव्ही सुरू करतो. तोडांनं गुणगुणणं सुरूच)
If you Call me.....

लता : बापू, काय चाललंय तुझं ?
(त्याच्या हातातील रिमोट घेऊन टीव्ही बंद करते..)

बापू : (ओरडतो) अगं-अगं आपल्या रूपासारखंच कुणीतरी दिसतंय. रूपा, रूपा ऽ ऽ (तिच्या हातातील रिमोट घेऊन पुन्हा सुरू करतो. तोंडानं गाणं सुरू आहे. त्याचं काल्पनिक रूपाशी बोलणं सुरू होतं. टीव्हीवर कसलंसं गाणं, त्याचं पुटपुटणं आणि लताच्या त्याला सावरण्यासाठी हाका)

लता : बापू ऽ , बापू ऽ
(बापू तिच्याकडं अनोळखी नजरेनं पाहू लागतो. आणि अंधार)

प्रवेश चौथा समाप्त

प्रवेश पाचवा

(स्थळ तेच नर्व्हस ब्रेकडाऊनच्या ॲटॅकमुळे बापूला दवाखान्यात ॲडमिट केलं आहे. लता आणि रूपा बाहेरून येतात.)

लता : ये, रूपा ! (रूपा घर न्याहाळते, सावकाश येते) बस ना रूपा !

रूपा : (उभीच) मला वेळ नाही, पटकन सांग काय सांगायचं ते.

लता : रूपा, अगं बस तरी. चहा करू का फक्कड ! अगदी तुझ्या स्टाईलचा !

रूपा : नको, बोल तू.

लता : बापू घरी नाहीये.

रूपा : ते तर तू येतानाच सांगितलंस. तो नाहीये म्हणूनच मी आले.

लता : तसं नाही, त्याला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केलंय.

रूपा : (बेफिकिरीनं) का बरं ?

लता : नर्व्हस ब्रेकडाऊन झाला त्याचा.

रूपा : हं.

लता : आतल्या आत किती गोष्टी दडवत होता कुणास ठाऊक. त्या सगळ्याचा उद्रेक झाला.

रूपा : आतलं आणि बाहेरचं ! हं !

रूपा : मग ? मी काय करू ?

लता : यू आर रिस्पॉन्सिबल फॉर दॅट !

रूपा : डोण्ट टॉक लाईक अ फूल ! तुम्ही नवऱ्याच्या ताटाखालचं मांजर असणाऱ्या बायका असंच म्हणणार. त्याच्या आजारपणाशी माझा काहीही संबंध नाही. ओ. के.? तुझं बोलणं झालं असेल तर मी निघते.

लता : तुला थांबावं वाटणारच नाही ग ! पळूनच जावंसं वाटेल.

रूपा : कशासाठी ? कशासाठी पळून जावं वाटेल ?

लता : आपल्यामुळं एखाद्याचं आयुष्य बिघडतंय ही जाणीव तुला पोखरतेय.

रूपा : हॅट ऽ ऽ मला दुसऱ्याशी काही देणंघेणं नाही. माझं लाईफ मी घडवतेय.

लता : थिंक ब्रॉड रूपा. असल्या उंडग्या आणि उठवळ धडपडीनं काही घडत नसतं.

रूपा : तुझ्या सल्ल्याची आणि गाईडन्सची मला गरज नाही. ऑर्थोडॉक्स !

लता : हे जे तुझं हिणवणं आहे ना, त्यानं गोत्यात येशील तू. स्वत:पलीकडं विचार करायला शीक. दुसऱ्याचा स्वत:साठी वापर करून घेण्याची वृत्ती टाकून दे. या 'यूज अॅन्ड थ्रो' प्रवृत्तीनं पस्तावशील.

रूपा : तुझ्या म्हणण्याप्रमाणं वागलं म्हणजे 'डिसेन्ट' आणि माझ्या मनाप्रमाणं वागणं म्हणजे 'यूज अॅन्ड थ्रो' काय ! तुला काय वाटतं? तुझ्या या बोलण्याचा अर्थ मला कळत नाही ? मला जाणून बुजून डिवचण्याचा प्रकार करतीयस तू.

लता : तुला डिवचणारी मी कोण ?

रूपा : तेच मला म्हणायंच आहे. कोण तू ? कशासाठी माझ्यामागं हा तगादा लावलास ? मी काय तुझं देणं लागते ?

लता : हेच ! 'देणं घेणं' या असल्या विचारापुढं जाण्याची तुझी कुवतच नाही.

रूपा : माझी कुवत तपासून घेण्यासाठी मी इथं आले नाही.

लता : रूपा, तुझ्या वर्तनानं एका कुटुंबाची वाताहत होतीय हे मला सुनवायचंय तुला. बापू तिकडं हॉस्पिटलात एकटा आहे. नर्सवर सोपवून आलीय मी त्याला.

रूपा : आय डोण्ट केअर !

लता : (मघाचा कणखर स्वर हळूहळू बदलतोय) रूपा, बापूच्या आजारपणावर कसलंही औषध नाही. डॉक्टरांशी माझी प्रदीर्घ चर्चा झाली.

रूपा : ती आता मला सांगत बसू नकोस.

लता : तुझा सहवास हाच त्याच्यावरचा प्रभावी उपचार आहे, असं डॉक्टरांनी सांगितलंय.

रूपा : इम्पॉसिबल ! बापूसारख्या माणसाच्या सहवासात मी एक क्षणही राहू शकणार नाही.

लता : ऐक तरी. तुझा काही तरी गैरसमज झालाय.

रूपा : मखलाशी करू नकोस. बी प्रॅक्टिकल.

लता : तू त्याच्यावर रागावून निघून गेल्यापासून त्याची तब्येत बिघडली. त्याच्या खाण्यापिण्यावर परिणाम झालाय. तो सतत तुझ्या रूममध्ये

जाऊन बसतो. नीटनेटक्या ठेवलेल्या वस्तू पुन्हा नीट ठेवायला लागतो. सारखी तुझी आठवण काढतो.

रूपा : (खळखळून हसते) आय सी ! म्हणजे लहान मुलं जसा धोसरा काढतात एखाद्याचा, तसा त्यानं माझा धोसरा काढलाय म्हण की.

लता : तू काहीही म्हण. पण त्याच्या आजारावर तुझा इथला वावर, तुझं नुसतं इथं उपस्थित राहणं हाच उपाय आहे. तू नीट समजून घे.

रूपा : मला गुंतवू नकोस. मी आता फसणार नाही.

लता : तुला कोणीही फसवलेलं नाही.

रूपा : तुझ्या डोळ्यासमोर घडल्या सगळ्या घटना. आणि तूच म्हणतेस असं ?

लता : माझ्या डोळ्यासमोर घडल्या म्हणूनच खात्रीनं म्हणू ाकते मी तसं. बापूला तू ओळखलं नाहीस.

रूपा : काय गरज मला नसत्या फंदात पडण्याची. मी तुम्हाला महिन्याच्या महिन्याला पे करीत होते. करत होते ना ? सगळा हिशेब चुकता केलाय.

लता : सारखा हिशेब उपयोगाचा नाही. बापूनं तुझ्यावर मुलीसारखी माया केली. 'व्हीआरएस' नंतर त्याच्यात नवी उमेद आली तुझ्यामुळं.

रूपा : मी फक्त 'पेईंग गेस्ट' होते इथं. त्या पलीकडं मला काहीही ठाऊक नाही.

लता : मी सांगते ना. तू तुझ्या दृष्टीनं राहत होती. पण बापूमध्ये खूप फरक पडला. अगं आयुष्यात कधी पूजा-बिजा केली नाही त्यानं. पण तू आलीस आणि सगळ्या गोष्टीत इंटरेस्ट घेतला त्यानं. लहानसहान गोष्टीत तो रमायला लागला. तुझ्यामुळं तो ॲक्टिव्ह झाला.

रूपा : ओके ना ! म्हणून मला पुन्हा इथं आणून तू वेठीला धरतीयस का ?

लता : अजिबात नाही. रूपा, तू आमच्या सहजीवनात बहार आणलीस. रक्ता-मांसाची कुठलीच नाती नाहीत आम्हाला. तू त्या सगळ्या पलीकडं नेलंस आम्हाला. मला मूल होणं शक्य नाही हे सत्य पचवण्यासाठी तुझं इथलं अस्तित्व महत्वाचं होतं. बापू तुझ्यात गुंतलाय एक मुलगी म्हणून.

रूपा : हे बघ, मला माझं आयुष्य आहे .....

लता : मी जाणते ते. तुझी कोणतीही गैरसोय मी होऊ देणार नाही. तुझी अडचण होऊ देणार नाही (रूपाचा फोन वाजतो, फोनवर राघू)

रूपा : हं, बोल राघू ! मी ना ? इथंच आहे.

लता : रूपा, तू बोल त्याच्याशी. मी आलेच चहा घेऊन (आत जाते.)

रूपा : (हाताने नकार देते) नाही रे. तेच तेच चाललंय सगळं. मला मुलगी मानतो तो. माझ्यामुळं ॲक्टिव्ह झाला तो वगैरे. (ऐकते) हं, हं हो ना. नर्व्हस ब्रेकडाऊन झालाय म्हणे त्याचा. नाही, आत्ता तो इथं नाहीये. ॲडमिट केलंय त्याला. हं, हं! पण आपण काय करणार त्याला. शी इज ब्लेमिंग मी. हाऊ कॅन आय ॲक्सेप्ट दॅट ? मला इथं राहायला बोलावतीय. माझ्या सहवासात त्याची तब्येत नीट होईल म्हणे.(ऐकते) येस. राईट. काय सांगतोस? तुझं डोकं फिरलंय का ? मी पुन्हा इथं राहायला येऊ ? अरे, एका खाईतून मी बाहेर पडले आणि तू पुन्हा मला त्यातच ढकलतोस. बापू सुधारावा यासाठी माझा बळी ? काय संबंध ? मी का सहन करू हे सगळं ? (ऐकते) अँगल ? छे ! दुसऱ्या कुठल्या अँगलनं बघूच शकत नाही मी या प्रकाराकडं! (ऐकते) असं कसं म्हणतोस? नाही, मान्य आहे मला, थोडा फार फरक पडतो माणसात पण ऐकते अरे, अरे पण - तुझं हे कसलं लॉजिक आहे ? (ऐकते) आता जरा ताठ बसते हं. हो. पैसे ना ? भरपूर आहेत. नाही नो प्रॉब्लेम ॲट ऑल! (ऐकते) म्हणजे मी इथं राहायचं ! आणखी एक वर्ष? ओके. (ऐकते) हं, तशा अटी घालता येतील. माझ्या खोलीत यायचं नाही वगैरे. (ऐकते) हं, ते ही नाही. विश्वास संपादन करायचा प्रॉब्लेमच नाही. माझ्यासाठी जीव टाकतात. ती दोघं! (ऐकते) आपला फायदा कितीतरी मोठा होईल. नाही, अवघड काही नाही. ओ के. तुझ्या या प्रोजेक्टमध्ये दम आहे. आपली चिंता कायमची नाहीशी होईल. ओ के. भेटू आपण. बाय. ती फोन ठेवते, आता तिच्यात बदल झालाय. (ती को-ऑपरेटिव्ह मुडमध्ये)

लता : (चहा घेऊन येते) रूपा, हा घे चहा.

रूपा : (चहाचा घोट घेत) वॉव ! फक्कड झालाय अगदी.

लता : तुझ्या स्टाईलचाच केलाय.

रूपा : वंडरफूल. आय लाईक इट ! कित्ती दिवसांनी असा मस्त चहा

मिळाला.

लता : रूपा, मी तुला रि`स्ट करते. तु पुन्हा इथं ये.

रूपा : तुझ्या या बेहतरीन चहासाठी तरी मला परत यावंसं वाटतंय.

लता : तसं म्हण ! अग चहाच काय, तुझ्याकडून आम्ही महिन्याचे पैसेही घेणार नाही.

रूपा : मग धान्य आणून द्यावं लागेल मला.वॉट यू कॉल दॅट अं अं शिधा?

लता : रूपा, काहीतरीच काय ! तुझ्या येण्यानं बापूला किती आनंद होईल. नवजीवन मिळेल त्याला.

रूपा : पण माझ्या काही अटी आहेत मॉम !

लता : रूपा, तुझ्यासाठी काहीही करायला तयार आहे मी. पण आम्हाला या अडचणीतून बाहेर काढ!

रूपा : ओ के. मी येते उद्याच. (घड्याळ पाहत) माय गॉड, इट्स टू लेट ! मॉम, मी पळते. सी यू टुमारो ! बाय. (निघते)

लता : बाय ! सकाळी लवकरच ये ग. आणि सामान आणायला मी येऊ का तिकडं ?

रूपा : नो ! माझं सामान असं काय आहे ? एक बॅग बस ! ए चल.

लता : हो, लवकर ये.

(रूपा जाते, लता प्रफुल्ल : अंधार)

प्रवेश पाचवा समाप्त

प्रवेश सहावा

(रुपा पुन्हा राहायला आल्यानंतर सहा महिने उलटले आहेत. बापू आणि लता बाहेरून येतात. आधी बापू आणि नंतर लता.)

बापू : चला, आज बरीचशी कामं उरकली ते बरं झालं! सगळीकडं अगदी वेळेवर पोचलो. नाही तर आपण जातो. आणि खोळंबून राहावं लागतं हा अनुभव काही नवा नाही. लता, आता तू- -
(वळून पाहतो. लता अजून काही आली नाही. छेः मी एकटाच बडबडतोय.) लता ऽ लता ऽ ऽ

लता : (आत येते) अरे काय झालं ओरडायला ?

बापू : कुठं गेली होतीस ? मी तू आहे समजून बोलतोय आपलं !

लता : अरे सबनीस वहिनी भेटल्या. म्हणाल्या, बापूची तब्येत ठणठणीत झालेली दिसतेय.

बापू : इतिहासजमा झाला तो आजार. उगाच नसत्या आठवणी काढू नका म्हणावं.

लता : बरं झालं तू पुढं आलास ते. नाहीतर तुम्हा दोघांची जुंपली असती चांगली !

बापू : त्या सबनीसवहिनींना नाही उद्योग. उगाच या बंगल्यात काय चाललंय,त्या घरात काय शिजतंय अशा चौकशा करीत बसते झालं.

लता : तुझ्या आजारपणात त्यांची मदतही खूप झाली रे !

बापू : लता, सहा महिने झाले ना त्या आजारपणाला. तू पुन्हा उगाळू नकोस ते दुखणं !

लता : या पोरीनं पुन्हा आणलं गाडं ताळ्यावर.

बापू : रत्न आहे ते रत्न !

लता : तुझी तब्येत बिघडवायला आणि पुन्हा सुधारायला ते रत्नच उपयोगी पडलं ना !

बापू : गेलंय कुठं ? आजच्या आपल्या सगळ्या कामांच्या गडबडीत तिची वस्तू आणणं ध्यानातच नाही राहिलं.....

लता : मी आणलीय ना ?

बापू : तू ? कधी ? अग आपण बरोबर तर होतो ना सगळा वेळ !

लता : तेच तर माझं 'स्किल' आहे बाबा !

बापू : ओके फाईन ! चल आण इकडं, मी तिला सरप्राईज देतो.

लता : 'सरप्राईज' असं थेट ओपन नाही करायचं. मी देते वेळेवर सगळं !

बापू : मी म्हणत होतो आजच देऊ या तिला. परवा म्हणत होती सगळं लक्षात ठेवावं लागतं. 'ऑल इन वन' झालं तर बरं होईल.

लता : डोण्ट वरी ! देऊ आपण तिला.

बापू : एकाच छोटया 'ॲपरेटस' मध्ये हजारो गाणी, हजारो फोन नंबर, सिनेमे, इंटरनेट ! सगळं जग खिशात घेऊन फिरणं म्हणतात त्याला.

लता : त्यात 'व्हॉइस डायलर' आहे.

बापू : हो, म्हणजे ज्याला फोन लावायचा आहे त्याच्या नावाचा उच्चार करायचा. की थेट फोन लागतो.

लता : म्हणजे मनात इच्छा व्यक्त करायचा अवकाश की ती व्यक्ती कानात बोलायला लागते.

बापू : चलो. हे बरं झालं. सगळी कामं मनासारखी झाली.

लता : मागच्या सहा महिन्यात किती धावपळ, किती गडबड. रूपा आली नसती तर माझं काही खरं नव्हतं बाई !

बापू : या पोरीनं सहा महिन्यात पुनर्जन्म दिला मला !
(रूपा येते, ओरडतच...)

रूपा : बॅप्स, मॉम ऽ ऽ अरे कुठं आहात ?

बापू : (पळत जाऊन तिच्या हातातील बॅग घेतो) आलो. किती ओरडतेस.

रूपा : ओरडू नको तर काय ! मला तर उड्या माराव्या वाटतायत.

लता : काही हरकत नाही. आम्हीही मारू दोन दोन उडया तुझ्याबरोबर !

बापू : येस ! नाहीतरी दोरीवरच्या उडया मारायला मला सांगितलंच आहे डॉक्टरांनी.

रूपा : ओ ऽ ऽ बॅप्स हे बघ. मला व्होकेशनल ॲवॉर्ड मिळालंय कंपनीत ! 'बेस्ट एम्प्लॉई' म्हणून आमची निवड झालीय.

बापू : फॅन्टास्टिक ! बघू !

लता : (कौतूकानं) व्वा ! खरं सांगू का रूपा, मागच्या सहा महिन्यात बापूची तब्येत ठिकाणावर आणण्याची तुझी कामगिरी गौरवास्पदच आहे.

रूपा : (लटक्या रागानं) मॉम, पुस्तकी बोलू नकोस. मी काही तरी केलं का ?

लता : तू काहीही म्हणालीस तरी सारं श्रेय तुझंच आहे. त्याचं औषधपाणी पाहण्यापासून त्याला वेगवेगळे धडे देण्यापर्यत सगळं तू केलंस !

बापू : रूपा, कंपनीत ॲवॉर्ड डिस्ट्रीब्युशन सेरेमनी झाला का ?

लता : आम्हाला बोलावलं असतंस तर आलो असतो आम्ही.

रूपा : अगं मला तरी कुठं ठाऊक होतं. आमची ॲन्यूअल मीटिंग झाली आणि तीत घोषणा झाली आमची.

बापू : आमची? म्हणजे तुझ्याबरोबर आणखी कुणाला मिळालं हे ॲवॉर्ड?

रूपा : आम्ही पाचजण आहोत. राघूही आहे त्यात. ॲवॉर्ड जिंकण्याची त्याची ही चौथी वेळ आहे !

लता : खरंच गुणी मुलगा आहे.

बापू : लता, चल ते आण, आपण आताच देऊन टाकू या तिला !

रूपा : काय ? काय देणार आहेस मला ?

लता : (पार्सल तिच्या हाती देत) बघ तूच !

रूपा : (पार्सल उघडते) मोबाईल ? काय क्यूट पीस आहे. मॉम ऽ (लताच्या गळयात पडते) व्हेरी ब्युटिफूल.

लता : तुला ॲवॉर्ड मिळाल्याबद्दल हे गिफ्ट आहे.

रूपा : तुम्हाला काय माहिती मला ॲवॉर्ड मिळणार आहे म्हणून. खरं सांगायचं तर माझं मलाच माहिती नव्हतं ते.

बापू : परवा तू म्हणालीस ना, हा मोबाईल सेट तुला हवा होता म्हणून.

रूपा : खूप महाग आहे तो...

बापू : त्याच्याशी तुला काय करायचं आहे ? जस्ट फरगेट द प्राईस !

रूपा : (गिरकी घेते) माझ्या मनात खूप दिवसापासून होता हा पीस ! रादर पहिल्यांदा ॲड बघितली तेव्हाच ठरवलं होतं, घ्यायचा एकदा!

लता : रूपा, आज अगदी खूष दिसतीयस, काही विशेष ?

बापू : (हसत) हे तुझं अगदी गमतीशीर विचारणं झालं.

लता : गमतीशीर काय आहे त्यात ?

बापू : अगं, कंपनीत मोठं ॲवॉर्ड मिळालंय तिला, शिवाय तिच्या मनातली गोष्ट मिळालीय तिला आणखी काय हवंय ?

लता : आणखी काय हवंय ? तिचा खरा आनंद वेगळाच आहे. बघ, विचार तिला !

बापू : होय रूपा? तुझ्याकडून आणखी आनंदाची गोष्ट कळणार आहे का?

रूपा : येस. आजच आमचं फायनल झालं.

बापू : काय फायनल झालं ?

रूपा : अरे मी आणि राघू लवकरच लग्न करतोय.

लता : छान. लवकर उडवून टाका बार !

रूपा : आज सेरेमनीनंतर राघूनंच मला प्रपोज केलं. मी खूप आनंदात आहे. राघू, राघू माय लव्ह !

बापू : बेस्ट झालं. चला, मी फ्रेश होऊन येतो. आल्यापासून बसलोय नुसता बोलतच !

रूपा : ओके, मीही फ्रेश होते. (ती तिच्या रूमकडं निघते)

लता : चलो. पोरीचं आयुष्य मार्गी लागलं.

बापू : आज खरंच आनंदाचा दिवस आहे पोरीसाठी !

लता : मलाही आनंद झाला. रूपानं लग्नाचा बेत सांगूनही तू बिथरला नाहीस.

बापू : बिथरायचं काय त्यात ! निर्णय झाला ना पक्का ! मग काय, होऊन जाऊ दे ! चल, मी येतोच.

लता : मी ही आलेच. (दोघे आत जातात रूपा तिच्या रूममध्ये आहे. ड्रेसिंग टेबलवर काही ठेवते वगैरे. एकदा नवा मोबाईल न्याहाळते. त्याचा मुका घेते. मग आपला मोबाईल काढून राघूशी बोलायला लागते.)

रूपा : हं राघू बोल. तू म्हणालास तसं केलंय सगळं. अरे, मागचे सहा महिने मी कसे काढले ते ते माझं मला ठाऊक. काय कळ काढ ? आता जास्त वेळ नको घालवायला. तुझ्या शब्दाखातर मी राहतीय इथं. हो. सगळं माझ्याकडं आहे. मी घेतलीय माहिती. आज सांगितलं मी आपण लग्न करणार आहोत म्हणून. काही नाही रे. फार काही केलं नाही त्यानं. तसं मॉमला मी मागेच सांगून ठेवलं होतं. तिचं काही नाही. मी सहा महिन्यात जी वागलीय त्यानं तिचा पक्का विश्वास बसलाय माझ्यावर. बापू तर पागलच आहे. अरे, पागल म्हणजे मी सांगेन तसं वागतो तो. पूर्वीही आणि आता तर जास्त ! संशयाचं काहीच कारण नाही. नो प्रॉब्लेम ॲट ऑल !

अरे, त्याचं क्रेडिट कार्ड, एटीएम कार्ड माझ्याकडं आहे. त्यामुळं काही अडचण नाही. लगेच पैसे काढून घेऊ शकतो आपण. अच्छा! आजच ना ? तू कार घेऊन येतोयस. अरे हो माझ्या फोननंतरच म्हणतीय मी. मीच करते कॉफी. कॉफीत ती कॅप्सुल घालू ना ! म्हणजे फोडून आतली पावडर की सगळी तशीच. ओके वेलकॉक्सिन नाव आहे त्यावर. राघू, तूच तर दिलीयस ना ती ! राईट. मी करते सगळं बरोबर ! चल, माझ्या फोनची वाट बघ आणि लगेच ये ! बाय. (रूपा फोन बंद करते. बाहेर येते. बापू आणि लता फ्रेश होऊन बाहेर आले आहेत.)

रूपा : (मोबाईलकडे पाहात) बॅप्स, बेहतरीन काम झालं. आजचा दिवस माझ्यासाठी सुवर्णाक्षरांनी का काय म्हणतात तसा लिहिण्यासारखा झालाय.

लता : आता पुस्तकी कोण बोलतंय ?

रूपा : पुस्तकी नाही मॉम. दिलसे ! अगदी मनापासून बोलतीय मी हे !

बापू : मोबाईलचं काही नाही पण तुला कंपनीत अॅवॉर्ड मिळालं ही मोठी गोष्ट आहे. मला तर नाचावंस वाटतंय.

रूपा : येस! बॅप्स, चलो आज तुझा आणि मॉमचा डान्स होऊन जाऊ दे !

लता : ए, आत्ता ? नको ग !

बापू : लाजतीयस का ?

रूपा : परदेशात, विशेषत: पाश्चात्य देशातले नागरिक कोणताही आनंद डान्स करूनच साजरा करतात.

बापू : कमॉन लता.

लता : हो, पण रूपा आपल्याकडं सगळ्या प्रतीच्या आनंदासाठी लोकगीतं आहेत. बारशापासून लग्नापर्यंत आणि भोजनावळीपासून शेतातल्या खळ्यापर्यंत सगळ्या आनंदाच्या प्रसंगात गाणीच म्हणतात.

रूपा : मग तू गाणं म्हणत डान्स कर. बापू, आर यू ऑलराईट ?

बापू : हे मला काय झालंय. चल लता. (रूपा सीडी प्लेअर ऑन करते. संथ, द्रुत अशा नृत्याच्या फेऱ्या होतात. रूपाही त्यात सहभागी होते)

बापू : बाप रे ! पुरे आता.

रूपा : बॅप्स, आता कुठं रंग भरतोय. चल या बीटवर मजा येईल !

(बापू तिच्या आग्रहाखातर डान्स करतो रूपा त्याला साथ देते. नृत्याची गती वाढल्यानं त्याला ढास लागते.)

बापू : (खोकत) आता बस झालं. (रूपा म्युझिक प्लेअर ऑफ करते)

लता : (बापूला आवरत) काय होतंय बापू ?

बापू : काही नाही. रूपा त्याला पाणी देते

लता : तू थोडं शांतपणे बस जरा.

रूपा : हो. मॉम, तू ही थकलीस. दोघं विश्रांती घ्या. मी तुमच्यासाठी कॉफी आणते. (आत जाते)

बापू : (कृतकृत्य) लता, पोरीनं जिंकलं आपल्याला.

लता : तुझ्या मनासारखं झालं ना.

बापू : अग आयुष्याकडून आता कसलंच मागणं नाही. सगळं कसं मस्त चाललंय.

लता : तुझ्या आजारपणात वाईट अवस्था झाली होती माझी.

बापू : तू खूप भोगलंस. एकटयानं . पण माझी रूपावरची माया सच्ची होती. त्यामुळं तिचं मनपरिवर्तन झालं.

लता : सुरवातीला जेव्हा मी रिक्वेस्ट केली तेव्हा काय संतापली. त्रागा केला.

बापू : आपली पोर असती तर तिनं जितकी काळजी घेतली असती तेवढं तिनं सांभाळलं.

लता : तुझी ओढ, तळमळ सार्थकी लागली. आजकालच्या तरूण मुली म्हणजे...

बापू : हा भंगडपणा आहे. आजकालची तरूण मुलं मुली असं म्हणायचं आणि हळहळत बसायचं.

लता : नाही अरे, मी बघते ना. खूप जणांच्या मुली अक्षरश: वाया गेल्या आहेत.

बापू : रूपा त्यातली नाही.

लता : ते मान्यच आहे मला. असल्या चंगळवादी धकाधकीत सोन्यासारखी आहे रूपा.

बापू : स्वत:चं म्हणून काही राखलं नाही तिनं. किती मिसळून गेलीय या घरात. (तो खोकतो.)

लता : पाणी देऊ का आणखी.

बापू : दे थोडंस ! (पाणी पितो)
(रूपा ट्रेमध्ये कॉफीचे मग घेऊन येते)

रूपा : आता पाणी ठेव ! गरमगरम कॉफी घे. बरं वाटेल. (आदरानं बापूला, लताला कॉफी देते. स्वत:चा मग घेऊन घुटका घेते. बापू आणि लताच्या कपात विषारी कॅप्सुल तिनं आतूनच घालून कॉफी आणलीय)

बापू : (घुटका घेत) व्वा ! उत्तम झालीय कॉफी.

लता : रूपाचा हात कोण धरेल कॉफी करण्यात.

रूपा : ऑफिसमध्येसुध्दा मशिनवर एस्प्रेसो कॉफी मीच करते.

बापू : रूपा, तुझ्या हातची कॉफी प्यायल्याशिवाय दिवस संपतो का कधी?

लता : आणि बापू, इतक्यावेळा रूपानं कॉफी दिली, पण चवीत काहीच फरक नाही. पहिल्यांदा केली होती, तशीच चव आहे.

रूपा : चव बदलायचं कारण काय ? सगळं तेच तर आहे. म्हणजे दुधाच्या क्वॉलिटीत फरक नाही. कॉफी तीच ! कॉफी करणारी तीच आणि पिणारी माणसंही तीच ! मग फरक काय पडणार !

लता : असं नको म्हणूस. मला एकाच चवीची कॉफी कधी करता आलेली नाही. (दोघांच्या कॉफीचे घुटके संपत आले आहेत लतानं कॉफी संपवली आहे.)

रूपा : (तिचा कप घेऊन) मॉम, तू असं म्हणावंस ?

लता : तुला उगीच फुगवायचं काय कारण ?

बापू : सो माय डियर रूपा, तुला आणखी एक अत्यानंदाची बातमी मी सांगतोय. (कॉफी संपवतो) रूपा, तसं पाहायला गेलं तर आपलं काही रक्ताचं नातं नाही. पण तुझ्यात मला माझी मुलगी दिसते. तू म्हणजे आमचं आमच्या घरात न जन्मलेलं अपत्य!
तुझा आवेश, तुझी धडाडी, तुझी निर्णय क्षमता, तुझी गुणवत्ता या सगळ्या गोटी आम्ही पाहत होतो. वडिलांविना वाढलेली तुझ्यासारखी मुलगी, भले कधी चुकलीही असेल. पण स्वत:च्या फीलिंगशी तिनं कधी प्रतारणा केली नाही. (लताला गुंगी येतेय) रूपा, तुला सांगायला आनंद वाटतो. आज सकाळीच आम्ही जेव्हा

बाहेर पडलो तेव्हा माझ्या वकिल दोस्ताकडं गेलो होतो. तसा आमच्या चर्चेनंतर निर्णय कधीच झालेला होता. लता माझ्या शब्दाबाहेर नाही. आयुष्यभर सावलीसारखी राहिली. कधी स्वत:साठी काही मागितलं नाही तिनं. रूपा, आज आम्ही आमची सगळी संपत्ती तुझ्या नावानं केली आहे. बँकेतली रक्कम, हे घर आमचं जे जे म्हणून आहे ते सगळं तुझ्या नावे केलं आहे.
(रूपाला धक्का बसतो. ती लताकडं पाहते, लता कोलमडते)
लता, लता काय झालं तुला ?

रूपा : बॅप्स, मॉम ऽ ऽ
(बापूही गुंगीत जातो. त्यालाही चक्कर येऊन तो पडतो. रूपानं कॉफीतून दिलेल्या विषाचा परिणाम झालाय. दोघेही निपचित.)

रूपा : बॅप्स ऽ ऽ

(दोघांच्या मृतदेहांकडं पाहत फुटते आणि निश्चल होते. नजर शुन्यात आणि पडदा !)

– समाप्त –